## ८० वर्षाच्या महिलेवर बिबट्याची झडप

**नंदुरबार :** जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील खुर्चीमाड गावात एक भयंकर घटना घडली आहे. ८० वर्षीय वृद्ध महिला घराबाहेर काही कामासाठी गेली असता दबा धरून बसलेल्या बिबट्याने या महिलेवर अचानक झडप घातली. बिबट्याने या महिलेवर झडप घालून तिला आपल्या तावडीत ओढून घेत बिबट्याने महिलेवर जोरदार हल्ला करत तिला जवळपास ५०० मीटर अंतरावर फरफटत नेले. यात महिलेचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आला आहे. या हल्ल्यामुळे गावात खळबळ उडाली असून ग्रामस्थांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले.


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५

किंमत ४ ₹




# तिरुपती बालाजी मंदिरात चेंगराचेंगरी

**। आंध्रप्रदेश । वृत्तसंस्था ।**

आंध्र प्रदेशमधील तिरुपती देवस्थानमध्ये दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. या देवस्थानमध्ये होणाऱ्या गर्दीचं नियोजन करण्यासाठी मंदिर प्रशासन समितीकडून अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र, यानंतरही बुधवारी रात्री तिरुपती बालाजी मंदिरात चेंगराचेंगरीची दुर्दैवी घटना घडली. देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये उडालेल्या गोंधळामुळे ही दुर्घटना घडली. यामध्ये आत्तापर्यंत सहा भाविकांचा मृत्यू झाला असून किमान ३० जण जखमी झाले आहेत. मंदिर व्यवस्थापन समितीच्या प्रमुखांनी आता या चेंगराचेंगरीसाठी कारणीभूत ठरलेली बाब स्पष्ट केली आहे.

बुधवारी संध्याकाळी तिरुपती देवस्थानमधील बैरागीपट्टेडाजवळ ही चेंगराचेंगरीची घटना घडली. यात जखमी झालेल्या ३० रुग्णांवर नजीकच्या रुग्णा •> पान २ वर

### नेमकं घडलं काय?

तिरूपती देवस्थानमध्ये दरवर्षी वैकुंठ एकादशी महोत्सवाचं आयोजन केलं जातं. ९ जानेवारी रोजीच्या या महोत्सवासाठी देवस्थानकडून भाविकांना दर्शनासाठीचे टोकन वितरीत करण्यात येत होते. यासाठी देवस्थानकडून स्वतंत्र काऊंटर्सची व्यवस्था करण्यात आली होती. असंच एक काऊंटर बैरागीपट्टेडा भागातील एमजीएम हायस्कूलमध्ये उभारण्यात आलं होतं. विष्णू निवास मंदिराजवळच हे काऊंटर होतं. बुधवारी सकाळपासूनच या काऊंटरवर टोकन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. संध्याकाळपर्यंत ही गर्दी मोठ्या प्रमाणावर वाढली. काही भाविकांमध्ये टोकन घेण्यासाठी धक्काबुक्की झाल्याचंही दिसून आलं.

## वेधक

### सत्तेत जाण्यापेक्षा लढणं पसंत– पवार

**मुंबई :** सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवारांचा पक्ष सत्तेत जाणार असल्याच्या बातम्या केवळ अफवाच आहेत, असं शरद पवारांनी स्पष्ट केलं आहे. शरद पवारांनी तरुणांशी संवाद साधताना, आपण जे सोबत येतील त्यांना घेऊन सत्तेत जाण्यापेक्षा लढणं पसंत करु, असंही शरद पवारांनी म्हटलं आहे. पुढील १५ दिवसांमध्ये संघटनेत मोठे बदल आपल्याला पाहायला मिळतील, असं सूचक विधानही यावेळेस शरद पवारांनी केलं आहे. १९९९ साली जी आपली परिस्थिती होती तीच आता निर्माण झाली आहे. आता माझ्याकडे देण्यासाठी काही नाही आणि गमावण्यासाठी देखील काही नाही, असंही शरद पवारांनी तरुण सहकाऱ्यांना सांगितलं. त्याचप्रमाणे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणूनच सामोरे जाणार असल्याचंही शरद पवारांनी स्पष्ट केलं आहे.

### मतिमंद मुलाने जन्मदात्याला संपवलं

**वाशिम :** एका मतिमंद मुलाने त्याच्या जन्मदात्या बापाच्या डोक्यात दगडाने वार करून जीवे मारल्याची खळबळजनक घटना घडली आहे. वाशिमच्या रिसोड तालुक्यातील लोणी बुद्रुक गावात ८ जानेवारी रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. निवृत्ती नरवाडे (वय ६५) असं मृत वडिलांचं नाव आहे. तर गणेश निवृत्ती नरवाडे (वय २५) असं आरोपी वेडसर मुलाचं नाव आहे.मृत वडील निवृत्ती नरवाडे आणि त्यांचा वेडसर मनोरुग्ण मुलगा गणेश नरवाडे हे दोघेही घरात असताना गणेशने अचानक वडिलांच्या डोक्यावर दगडाने वार केले. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

### वाल्मिक कराडवर १५ गुन्हे दाखल

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येशी संबंधित पवनचक्की कंपनी खंडणीप्रकरणी गुन्हा नोंद झालेल्या वाल्मिक कराडवर या आधीही अनेक गुन्हे नोंद असल्याचं समोर आलं आहे. वाल्मिक कराडवर या आधी १५ गुन्हे दाखल आहे. यापैकी ८ गुन्ह्यात त्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. तर खंडणीसह इतर ४ प्रकरणे ही न्यायप्रविष्ठ आहेत. कराड हा राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास योग्यरित्या व्हायचा असेल तर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांसह सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनीही केल्यानं वातावरण अजून चिघळले असल्याचं दिसून आलंय.

# शेतकरी आक्रमक

### दिघी महामार्ग बंद करण्याचा पवित्रा; महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाकडून शेतकऱ्यांची फसवणूक

**। गणेश प्रभाळे ।**
**। दिघी ।**

**रायगड जिल्ह्यातील राजपुरी खाडीवर विकसित होत असलेल्या दिघी पोर्टला जोडणारा दिघी–पुणे महामार्ग म्हसळा तालुक्यातील सकलप आणि तोंडसुर या बायपास मार्गावरून काढण्यात आला आहे. मात्र, रस्ता पूर्ण होऊनही अद्याप मोबदला न मिळाल्याने बाधित शेतकऱ्यांनी आक्रमक पावित्रा घेत रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला आहे.**

दिघी पोर्टकडून होणारी अवजड वाहतूक ही म्हसळा शहरातुन होत असताना, पर्याय म्हणून पोर्ट प्रशासनाने वाहतूक सोयीसाठी तोंडसुर (बौद्धवाडी) ते श्रीवर्धन मार्गाला जोडण्याचा बायपास मार्ग बनवण्याचा आराखडा तयार केला. जमीन अधिग्रहण करण्याचे काम होऊन



२०१९ मध्ये रस्त्याचे कामही सुरु केले. दोन वर्षात रस्ता पूर्ण होऊन बायपास मार्ग सुरू करण्यात आला.

या रस्त्यासाठी सकलप व म्हसळा येथील बावीस शेतकऱ्यांची साधारण ५८ गुंठे जमीन गेली आहे. त्यातील जवळपास आठ शेतकऱ्यांची २६ गुंठे जमीन अधिग्रहण होऊन त्याचा मोबदला अद्याप मिळाला नाही. त्यावेळी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करताना तीन महिन्यात जमिनीचा मोबदला देण्याचे सांगितले होते, मात्र, रस्त्याचे काम पूर्ण आणि रस्ता सुरळीत सुरू होऊन चार वर्ष उलटले तरी मोबदला दिला नाही.

आज येथील बाधित शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. जमिनी गेल्या. मात्र, कुटुंबाचे शेतीवरती उदरनिर्वाह अवलंबून असल्याने हतबल झाला आहे. प्रशासनाकडून मदत मिळाली नसून अक्षरशः त्यांच्या घरादारावर नांगर चालवला गेला आहे. अशी शेतकऱ्यांनी न्यायासाठी आर्त हाक दिली आहे. परिणामी, येत्या पंधरा दिवसात जमिनीचा मोबदला मिळाला नाही तर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

> **या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक बघितलं जाईल. कार्यालयाच्या मुख्यालयात प्रस्ताव गेला आहे. माहिती घेऊन लवकरच सांगतो.**
> **– सारंग इनामदार, अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ**

> **गेली सहा वर्षे जमिनीचा मोबदला मिळावा म्हणून अधिकाऱ्यांच्या मागे पाठपुरावा करत आहे. मात्र, अद्याप एक दमडी मिळाली नाही. आता तरी प्रशासनाने लक्ष घालावे.**
> **– संतोष काते, बाधित शेतकरी.**

# 1,804 वनहक्क दावे फेटाळले

### ७५ वर्षाचे सबळ पुरावे नसल्याने दावे नाकारण्यात आल्याची माहिती समोर

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

उपजिविकेकरीता, शेती करण्यासाठी वनजमीन मिळावी, यासाठी जिल्हास्तरिय समितीकडे आठ हजार ४६० दावे दाखल करण्यात आले होते. पडताळणीत सहा हजार ६५६ दावे मंजूर करण्यात आले. एक हजार ८०४ जणांचे दावे फेटाळण्यात आले आहे. ७५ वर्षाचे सबळ पुरावे नसल्याने दावे नाकारण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

रायगड जिल्ह्यातील सुमारे १७२५.४४ चौरस किलो मीटर इतके वनाचे क्षेत्र आहे. अलिबाग, पेण, पनवेल, श्रीवर्धन, रोहा, माणगाव महाड, तळा, पोलादपूर, उरण, खालापूर आदी तालुक्यांमध्ये अनुसूचित तथा आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. उपजिविकेसाठी जंगल व वनांमध्ये वेगवेगळ्या पिकांची लागवड करून हा समाज त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. जमिनीवर अवलंबून असणाऱ्या अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांना स्वतःच्या उपजिविकेसाठी आणि शेती करण्यासाठी वन जमीन धारण करण्याचा अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) कायदा २००६ (वनाधिकार कायदा) मध्ये मंजूर करण्यात आला. २००६ साली मंजूर झालेल्या वनाधिकारी कायद्यानुसार, स्थानिक समाज, ज्या भूमीचा पूर्वापार वापर करीत आले आहेत. त्यांना उपजिवेकेचे साधन म्हणून जमीन देण्याची तरतूद करण्यात आली. त्यासाठी ग्राम, उपविभागीय व जिल्हास्तरावर समिती गठीत करण्यात आली. ग्रामस्तरावरून •> पान २ वर

> **फेटाळलेल्या वनहक्क दाव्यांचा समितीने पुनर्विचार करणे गरजेचे आहे. आजही जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांमधील नागरिकांना जागेची गरज आहे. वैयक्तीक बरोबरच सामुहिक वनहक्क दाव्यांची प्रकरणे जिल्हा स्तरावर प्रलंबित आहेत. दोन ते तीन वर्षे हे प्रकरणे आहेत. सामुहिक वन हक्क दाव्यांचे प्रकरणे मार्गी न लागल्याने जिल्ह्यातील १८१ वाड्या रस्त्याविना आहेत.**
> **– संतोष ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते**

> **अर्जदारांनी पुराव्यासहित दावे दाखल केले. समितीसमोर पुरावे दाखविण्यात आले. तरीदेखील दावे फेटाळण्यात आले. वन विभागाच्या अहवालाचा आधार घेत दावे फेटाळले आहेत. त्यामुळे नाकारलेल्या दाव्यांचे पुन्हा विचार करणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांची बैठक घेऊन प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जाईल. – उल्का महाजन, सामाजिक कार्यकर्त्या**

# लाचखोर मंडळ अधिकारी जाळ्यात

### १ लाखांची लाच घेणं भोवलं; कर्जतची परंपरा कायम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत महसूल विभागातील मंडळ अधिकारी चंद्रकांत केंडे यांनी कराळेवाडी येथील शेतकऱ्याच्या दहिगाव येथील जमिनीच्या फेरफार नोंदीसाठी शेतकऱ्याकडे १ लाख रुपयांची मागणी केली होती. या प्रकरणी लाचलुचपत विभागाने सापळा रचून कडाव येथील महसूल मंडळ अधिकारी केंडे याला एक लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले.



कर्जत तालुक्यातील कडाव येथे महसूल विभागाच्या मंडळ अधिकाऱ्यांचे कार्यालय आहे. केंडे यांनी कराळेवाडी येथील शेतकरी नागेश भालचंद्र तुपे यांच्या जमिनीची फेरफार नोंद सातबारा उताऱ्यावर करण्यासाठी प्रकरण सादर केले होते. संबंधित प्रकरण तलाठी मार्फत मंडळ अधिकारी केंडे यांच्याकडे मंजुरीसाठी आले होते. ३१ डिसेंबर रोजी तक्रारदार यांचेकडे मंडळ अधिकारी चंद्रकांत केंडे यांनी सातबारा उताऱ्यावर फेरफार नोंद कायम करण्यासाठी एक लाखाची लाच मागितली. ७ जानेवारी रोजी संबंधित शेतकऱ्याने आपल्याकडे मागितलेल्या लाचेबद्दल लाचलुचपत विभागाकडे धाव घेतली. त्यानुसार रायगड लाचलुचपत विभागाने कर्जत तालुक्यातील कडाव येथील मंडळ अधिकारी कार्यालयाबाहेर सापळा रचला.

यावेळी मंडळ अधिकारी चंद्रकांत ठकाजी केंडे (रा. नित्य चंद्रदर्शन हाऊसिंग सोसायटी, नागोठणे, ता.रोहा) •> पान २ वर

#### लाचलुचपत विभागाचे नागरिकांना आवाहन

**रायगड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्यावतीने खासगी इसम (एजंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड, अलिबाग कार्यालय दुरध्वनी (०२१४१– २२२३३१)/ टोल फ्री क्र. १०६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.**

# एनएमसीच्या ठेकेदाराविरोधात पनवेल पालिकेची तक्रार

### परवानगीशिवाय नवी मुंबई पालिकेच्या कंत्राटदाराने वृक्षतोड केल्याचा आरोप

**। पनवेल ग्रामीण । विशेष प्रतिनिधी ।**

जलवाहिनी टाकण्याच्या कामात अवैधरित्या वृक्षतोड करण्यात आल्याचा आरोप करत नवी मुंबई पालिकेच्या कंत्राटदार कंपनी विरोधात पनवेल पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागाकडून करण्यात आला आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

खारघर येथील सामाजिक कार्यकर्ते आणि •> पान २ वर

> **सध्या सुट्टीवर असून अधिक माहिती वृक्षप्राधिकरण विभागाचे अधिकारी संदीप पवार देऊ शकतील.**
> **– बाबासाहेब राजळे, उपायुक्त, पनवेल पालिका**

#### अधिकाऱ्यांची उडवाउडवी

**उपायुक्त राजळे यांनी दिलेल्या उत्तरानंतर वृक्षप्राधिकरण विभागाचे प्रमुख संदीप पवार यांच्याशी संपर्क साधला असता आपण देखील सुट्टीवर असल्याचे सांगत तक्रारदार लिपिक जळे यांच्याशी संपर्क साधण्याची सूचना पवार यांनी केली. मात्र अधिक माहिती देण्यासाठी जळे उपलब्ध होऊ शकले नाहीत.**

# शिवभोजन केंद्रचालकांवर उपासमारीची वेळ

### तीन ते चार महिन्यांचे अनुदान थकले

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील शिवभोजन केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. जवळपास तीन ते चार महिन्यांचे अनुदान थकले असल्याने अनुदान कधी मिळेल, असा सवाल उपस्थित झाला आहे. पनवेल पुरवठा विभागाकडून होत असलेल्या उशिरामुळे त्यांच्या अनुदानाला विलंब झाला आहे.

शिवभोजन थाळीचा लाभ पनवेल परिसरातील अनेक गोरगरीब नागरिक घेत आहेत. सद्यस्थितीत १० रुपयांमध्ये शिवभोजन थाळी मिळत आहे. ही योजना पनवेल परिसरात यशस्वी झाली आहे. मात्र तीन ते चार महिन्यांपासून शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नसल्याने केंद्र चालकांना तारेवरची



कसरत करावी लागत आहे. पनवेल तालुक्यात शहरी भागात १० आणि ग्रामीण भागात ९ अशी जवळपास १९ केंद्र आहेत. दररोज अंदाजे दोन हजारपेक्षा जास्त थाळींचे प्रत्यक्ष वाटप केले जाते. ग्रामीण भागासाठी २५ रुपये प्रति थाळी आणि शहरी भागासाठी ४० रुपये प्रति थाळी अनुदान मिळते. मात्र सप्टेंबर ते डिसेंबर या महिन्याचे अनुदान मिळण्यासाठी पनवेलच्या पुरवठा विभागाकडून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे बिले वेळेवर पाठवण्यात आले नाहीत. त्याचा फटका केंद्रचालकांना बसत आहे. जिल्हा प्रशासनाकडे पुरेसा निधी असूनही पुरवठा विभागाच्या दिरंगाईमुळे हे अनुदान रखडले आहे.

अनेक शिवभोजन चालक उसनवारी करून केंद्र चालवत आहेत. •> पान २ वर

> **डिसेंबर शेवटी आमच्याकडे अनुदानाची बिले आली आहेत. पाच–सहा दिवसात त्यांच्या अनुदानाचे काम होईल.**
> **– सर्जेराव सोनवणे,** जिल्हा पुरवठा अधिकारी, अलिबाग

# राज्यपाल नियुक्त आमदारांबाबतची याचिका फेटाळली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या विरोधात दाखल झालेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. न्यायमूर्ती बोरकर आणि न्यायमूर्ती उपाध्याय यांच्या खंडपीठात ही याचिका दाखल होती. ती फेटाळल्यानंतर याचिकाकर्ते सुनील मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयात या निर्णयास आव्हान देणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, घटनेचा आधार घेऊन याचिका फेटाळली आहे का? हे आम्हाला तपासावे लागेल. या याचिकेवर सुनावणी दरम्यान आम्ही अनेक राज्यांचे दाखले दिले होते. मात्र न्यायालयाने त्याचा विचार केलेला दिसत नाही.

न्यायालयीन प्रक्रियेत भाजपच्या लोकांचा हस्तक्षेप वाढला आहे. या प्रकरणातदेखील भाजपच्या लोकांचा हात आहे असा आम्हाला वास येत आहे, असा आरोप सुनील मोदी यांनी भाजपवर केला.या निकालामुळे महायुतीकडून दिलेल्या नव्या सात आमदारांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा आहे. यापूर्वीच महायुतीने सात जणांची नावे राज्यपालांकडे पाठवली आहेत. आता आणखी पाच नावेदेखील महायुतीकडून जाहीर होतील, अशी अपेक्षा आहे. त्यावर बोलताना सुनील मोदी यांनी महायुती नव्याने करण्यात येणाऱ्या या सर्वच राज्यपाल नियुक्त आमदारांच्या नियुक्तीवर आम्ही आक्षेप घेणार असल्याचे सांगितले.

### कॉपीमुक्त, भयमुक्त होणार परिक्षा | शिक्षण मंडळाचं महत्वाचं पाऊल

# परीक्षा केंद्रावर राहणार सीसीटीव्हीची नजर

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राज्यामध्ये दहावी तसेच बारावीच्या परीक्षा केंद्रांवर प्रत्येक खोलीत सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्याचे आदेश शिक्षण मंडळाकडून काढण्यात आले आहेत. मंडळाचा निर्णय योग्य असला तरी सीसीटीव्हीचा खर्च कोणी करायचा यावरून पेच निर्माण झाला आहे.

राज्यात होऊ घातलेल्या दहावी तसेच बारावीच्या परीक्षेदरम्यान प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्याचे आदेश मंडळाने काढले आहेत. इतकंच नाही तर वीजपुरवठा खंडित झाल्यास सीसीटीव्ही यंत्रणा बंद पडू नये,



यासाठी इन्व्हर्टर किंवा जनरेटरची व्यवस्था करावी लागणार आहे. सीसीटीव्हीमध्ये चित्रीत झालेले चित्रीकरण विशिष्ट कालावधीसाठी जपून ठेवावं लागणार आहे. आदेशाच्या अंमलबजावणीबाबत शाळांचे मुख्याध्यापक तसेच केंद्रप्रमुखांकडून हमीपत्र घेण्यात येत आहे.

कॉपीमुक्त तसेच भयमुक्त परीक्षेसाठी शिक्षण मंडळानं हे पाऊल उचललं आहे. परीक्षेदरम्यान कॉप्यांचा सुळसुळाट किंवा सामूहिक कॉपीचे प्रकार अनेक ठिकाणी बघायला मिळतात. विद्यार्थी, पालक इतकच काय तर शिक्षक आणि संस्थाचालक देखील त्यात सहभागी असतात. या सगळ्या पार्श्वभूमीवर शिक्षण मंडळाच्या •> पान २ वर

#### प्रत्येक केंद्रावर १० सीसीटीव्ही

**राज्यामध्ये दहावीची सुमारे ५००० तर बारावीची सुमारे ३००० परीक्षा केंद्र आहेत. प्रत्येक केंद्रावर किमान १० सीसीटीव्ही बसवावे लागणार आहेत. एका सीसीटीव्हीसाठी साधारणपणे २० ते २२ हजार रुपये खर्च येतो. त्यामुळे परीक्षा केंद्र असलेल्या शाळांना सीसीटीव्ही यंत्रणेवर लाखो रुपये खर्च करावे लागणार आहेत. शिक्षण मंडळाचा निर्णय योग्य आहे मात्र सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी आवश्यक निधी शिक्षण मंडळानं उपलब्ध करून द्यावा अशी मागणी शाळांकडून होत आहे.**

#### परीक्षांचे अंतिम वेळापत्रक अखेर जाहीर

**सन २०२५ ची फेब्रुवारी–मार्चमध्ये घेण्यात येणारी दहावी–बारावीची परीक्षा नेहमीपेक्षा ८ ते १० दिवस आधी आयोजित करण्याचा मंडळाचा मानस असून त्याअनुषंगाने लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्याचे राज्य मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

# आता मिळणार ई-रेशनकार्ड

**। पुणे । प्रतिनिधी ।**

शिधापत्रिका धारकांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आता तुम्ही नव्याने शिधापत्रिका काढणार असाल तर तुम्हाला पिवळे, केशरी किंवा पांढरे रेशन कार्ड मिळणार नाही. कारण आता रेशनकार्ड छपाई बंद करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या दिवसांत राज्यात तुम्हाला कोणतेही रेशन कार्ड मिळणार नाही.

रेशनकार्डला पर्याय म्हणून तुम्ही ई रेशन कार्ड वापरू शकणार आहात. तसंच, तुमच्याकडे असलेले रेशन कार्डही वॅलिड राहणार आहे. यासंदर्भात नागपूर जिल्हा अन्नपुरवठा अधिकारी आनंद पडोळे यांनी माहिती दिली.



ई –रेशन कार्डवरही लाभार्थी कोणत्या गटातील आहे हे नमूद असणार आहे. त्यामुळे कोणत्याही योजनेचा लाभ घेताना लाभ देणाऱ्यांना याची माहिती असणार आहे. या रेशनकार्डांची छपाईच आता बंद होणार असल्याने ई– रेशन कार्डमध्ये याचं वर्गीकरण कसं होणार? असाही प्रश्न यावेळी विचारण्यात आला. त्यावेळी पुरवठा अधिकारी पडोळे म्हणाले की, ई – रेशन कार्डवरही लाभार्थी कोणत्या गटातील आहे हे नमूद असणार आहे. त्यामुळे कोणत्याही योजनेचा लाभ घेताना लाभ देणाऱ्यांना याची माहिती असणार आहे.

दरम्यान, आता नव्याने रेशन कार्ड काढायला गेलात तर तुम्हाला ई– शिधापत्रिकाच मिळणार आहे. तसंच, ज्यांच्याकडे छापलेली शिधापत्रिका आहे, त्यांना जर दुय्यम ई रेशन कार्ड हवं असेल तर त्यांना त्यासाठीही अर्ज करता येणार आहे. सध्याच्या घडीला राज्य सरकारकडे जितके शिधापत्रिका उरले आहेत, त्याचं वितरण करून ते संपुष्टात आणण्यात येणार आहे. त्यानंतर संपूर्ण राज्यभर फक्त ई–रेशन कार्ड अस्तित्वात येणार आहे, असंही पुरवठा अधिकारी पडोळे यांनी स्पष्ट केलं.

# खारबंदिस्तीच्या नूतनीकरणासाठी चार कोटी

**। रायगड । प्रतिनिधी।**

**एकेकाळी भाताचे भरघोस पीक देणाऱ्या धेरंड-शहापूर येथील शेतजमीन खाऱ्या पाण्यामुळे नापीक झाली आहे. याचे मुख्य कारण रखडलेली बांधबंदिस्तीची दुरुस्ती सांगितले जाते. बंदिस्तीची लवकरात लवकर डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने करण्यात येत आहे. आता खारभूमी योजनेच्या नूतनीकरणासाठी राज्य सरकारने चार कोटी २४ लाखांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे.**



(संग्रहित छायाचित्र)

नवी मुंबई विमानतळासाठी मोठ्या प्रमाणात खाडी भागात भराव करण्यात आला आहे. त्यामुळे समुद्राच्या उधाणाचे पाणी धरमतर खाडीभागात जास्त उसळते. कालांतराने उधाणाच्या लाटांची उंची वाढणार असल्याने धेरंड-शहापूर परिसरातील बांधबंदिस्तीची दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकरी करीत होते; मात्र जो निधी मंजूर झाला आहे, तो दुरुस्तीसाठी कमी पडेल, अशीही शंका शेतकऱ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यातील खारभूमी योजनांच्या कामांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची ओरड नेहमीच होते. योजनांची कामे होत नसल्याने शेकडो एकर शेती नापीक झाली आहे. राज्य सरकारने नुकतीच अलिबाग तालुक्यातील धेरंड खारभूमी योजनेच्या नूतनीकरणाच्या चार कोटी २४ लाख ३६ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यामुळे धेरंड-खारभूमीची कामे लवकरच मार्गी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

> **धेरंडमध्ये दोन ब्रिटिशकालीन दोन उघाड्या आहेत. पाइप टाकून त्यांचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बंधाऱ्याची उंची तीन मीटर असणे गरजेची आहे. सध्या येथील बंधाऱ्यांची उंची दोन मीटरपर्यंतच केली जाते. काही वर्षांपूर्वी झालेल्या बैठकीत महत्त्वाच्या सूचना मांडल्या होत्या, त्यांची अंमलबजावणी गरजेची आहे.**
> **- राजन भगत, समन्वयक, श्रमिक मुक्ती दल.,**

### कोकणात ५७५ खारभूमी योजना

कोकणातील समुद्रकिनारी आणि खाडीकिनारी असणाऱ्या शेतजमिनींना खारभूमी असे संबोधले जाते. उधाणांपासून शेतजमिनींचे संरक्षण व्हावे, यासाठी बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्याला खारबंदिस्ती म्हणतात. कोकणात ५७५ खारभूमी योजना आहेत. त्यात रायगड जिल्ह्यातील १६५ योजनांचा समावेश आहे. पूर्वी या बंदिस्तीच्या देखभाल दुरुस्तीची कामे लोकसहभागातून केली जायची; मात्र आता बंदिस्तीची ही कामे खारभूमी विभागाकडून केली जातात.

### २२ हजार हेक्टर क्षेत्र बाधित

रायगड जिल्ह्यात उरण, पेण, अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यात समुद्राचे खारे पाणी शेतात घुसत असल्याने पिकती भातशेती नापीक झाली आहे. रायगड जिल्ह्यातील खारभूमीच्या दुरवस्थेमुळे २२ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र समुद्राच्या पाण्यापासून संरक्षित होणे आवश्यक होते; मात्र तसे न झाल्याने अलिबाग तालुक्यातील बहिरीचापाडा, मानकुळे, धेरंड-शहापूर आदी गावे समुद्र गिळंकृत करीत आहे.

### धेरंडचे १४९ क्षेत्र संरक्षित होणार

नादुरुस्त खारभूमी योजनांची कामे करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाने, नववर्षाच्या मुहूर्तावर अलिबाग तालुक्यातील धेरंड खारभूमी योजनेच्या नूतनीकरणाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे. एकूण चार कोटी २४ लाख ३६ हजार १९३ रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रति हेक्टरी खर्च दोन लाख ८४ हजार ८०७ इतका खर्च येणार आहे. धेरंड खारभूमी योजनेच्या नूतनीकरणामुळे १४९ हेक्टर क्षेत्राचे संरक्षण होणार आहे.

# 'आदिवासी वाड्यांचे चौक परिसरात पुनर्वसन करा'

**। कामोठे । वार्ताहर ।**

इर्शाळवाडी दुर्घटनेनंतर राज्य सरकारने बाधितांचे पुनर्वसन केले. त्याप्रमाणे रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील ८६ आदिवासी भागामध्ये दरडप्रवण क्षेत्रातील वाड्यांचे पुनर्वसन चौक, नढाळ वरसेवाडी या भागात करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या लोक आंदोलन न्यास संघटनेच्या कार्याध्यक्ष कल्पना इनामदार यांनी प्रयत्न सुरू केले आहेत.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे.

रायगड जिल्ह्यात अतिशय दुर्गम भाग, मोठे डोंगर, पर्वतरांगा, घनदाट जंगल आहे. आदिवासी समाज अतिदुर्गम भागात राहत असून, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने दुर्गम दरडप्रवण क्षेत्रातील आदिवासीवाड्यांना धोका निर्माण होतो. १९ जुलै २०२३मध्ये इर्शाळवाडीची दुर्घटना घडली. त्या घटनेतील निष्पाप आदिवासींना रस्ता नसल्यामुळे वेळेत मदत देऊन वाचवण्यात यंत्रणेला अडचणींचा सामना करावा लागला होता.

या दुर्घटनेत बरीच आदिवासी कुटुंबे दरड कोसळल्यामुळे मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकून पडली होती. त्यामध्ये अनेकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर सरकारने इर्शाळवाडीचे पुनर्वसन केले. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील खालापूर, कर्जत, सुधागड, पेण, रोहा, पनवेल, अलिबाग तालुक्यांतील ८६ वाड्यांचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे, असेही इनामदार यांनी निवेदनात म्हटले आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रणव दिपक हरलालका २) अंजली दिपक हरलालका यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४६ | २ | १-७२-५० | १२-८८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १०/०१/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात रेझिंग डे



## दिघी सागरी पोलिसांचं मार्गदर्शन

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या निमित्ताने श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या वतीन रेझिंग डे सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं.त्याच अनुषंगाने दिघी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवार दि.७ जानेवारी रोजी रेझिंग डे आयोजित करण्यात आला.

पोलिसांचा जनतेशी असणारा संपर्क वाढावा, तो अधिक वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी विद्यार्थ्यांना चोवीस तास ऑन ड्युटी असणाऱ्या पोलिसांचं कामकाज कसं चालतं याविषयी माहिती दिली.

आता प्रत्येकाच्या हातात असलेल्या मोबाईलमुळे डिजिटल पेमेंट म्हणजेच ऑनलाइन आर्थिक व्यवहार वाढले आहेत हीच संधी साधून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे चोरटेदेखील आता ऑनलाईन पद्धतीने आर्थिक फसवणूक करुन आपल्या बँक खात्यातील पैसे क्षणात गायब करीत आहेत.त्याबाबत आपण सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श याबाबत जागरुकता निर्माण होऊन बाल लैंगिक शोषणाच्या घटना टाळण्यासाठी मोलाचं मार्गदर्शन करतानाच तुमच्या बाबतीत काही चुकीचं घडत असेल तर तुम्ही पोलिसांकडे या आम्ही तुम्हाला नक्कीच मदत करु असा विश्वास देतानाच कोणतीही चांगली वाईट गोष्ट लपवून न ठेवता आई-वडील शिक्षक आणि मित्र-मैत्रिणींजवळ बोला असा सल्ला दिला. याप्रसंगी पोलीस कर्मचारी उल्हास चौलकर, शाळा व्यवस्थापन समितीचे चंद्रमणी मोरे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व इयत्ता सातवी ते बारावीचे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचं सूत्रसंचालन मिसबा पुरकर यांनी तर विद्यार्थ्यांजवळ संवाद साधून विविध विषयांवर केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मुख्याध्यापक सचिन मापुस्कर यांनी पोलीस प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

## खांब साईनगर तीन दिवस अंधारात

**कोलाड :** खांब साईनगर येथील ट्रान्सफार्मवरील तांब्याच्या तारेची कॉइल चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे गेली तीन दिवस साईनगर गाव हे अंधारात असल्याचे समजते खंडित झालेला विद्युत पुरवठा सुरू करण्यास सबंधित खात्याकडून टाळाटाळ होत असून अद्याप ग्रामस्थांना अंधाराशी सामना करावा लागत आहे. या घटनेची माहिती सुरेश सोननीस यांनी कोलाड पोलिसांना दिली. कोलाड पोलिस निरिक्षक नितिन मोहिते यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत घटनस्थळी भेट देत पाहणी केली. विद्युत रोहित्र अज्ञात इसमांनी नटबोल्ट खोलून पोलवरुन खाली पाडून त्यामध्ये असणारे ऑइल सांडवून नुकसान केले. रोहित्रातील तांब्याची कॉइल चोरून नेली असून यात तब्बल २६,००० रुपये किंमतीचे विद्युत रोहित्रातील ऑइल असून अंदाजे ४५ किलोग्रम वजनाचे तांब्याची कॉईल आहे.



# हिराचंद म्हात्रे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद शाखा रायगड तर्फे उरण तालुक्यातील नविन शेवे शाळेचे मुख्याध्यापक हिराचंद म्हात्रे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संयमी व शांत असा स्वभाव असलेले हिराचंद म्हात्रे यांनी नविन शेवे शाळेत आपल्या कार्याचा उत्तम ठसा उमटविला आहे.हिराचंद म्हात्रे यांचे शैक्षणिक क्षेत्रात महत्वाचे योगदान राहिले आहे.आपल्या उपशिक्षकांना हाताशी धरुन त्यांनी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले. याच त्यांच्या कार्याचा गौरव शिक्षक परिषदेने केला. यावेळी राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, कोप्रोली केंद्राचे केंद्र प्रमुख बबन पाटील, शंकर म्हात्रे, वैभव कांबळे, नरेश मोकाशी, निर्भय म्हात्रे, महेंद्र गावंड, म्हात्रे कुटुंबिय प्रितेश व चेतन म्हात्रे उपस्थित होते. यावेळी हिराचंद म्हात्रे यांच्यावर शिक्षकांकडून अभिनंदन होत आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## PUBLIC NOTICE

**VINATI ORGANICS LIMITED**
**Regd. Office : B-12 & B-13/1, MIDC Industrial Area, Mahad, Raigad District, Maharashtra - 402309.**

**Notice** is hereby given that the certificates for the undermentioned securities of the Company has been lost and the holder of the said securities / applicant has applied to the Company to issue duplicate certificates. Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within **15 days** from this date, else the Company will proceed to issue duplicate certificates without further intimation.

| Name of the Holder | No of Securities | Folio No | Certificate No | Distinctive Numbers |
|---|---|---|---|---|
| Rajendra Kumar Singi (As per Share Certificate) Rajendra Prasad Singi (As per Documents) | 750 Equity Shares at face Value Rs.2 | 004417 | 146 | From 13819421 To 13820170 |

## पान १ वरून

## तिरुपती बालाजी मंदिरात चेंगराचेंगरी

हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी दाखल करण्यात आलं आहे. या ३० पैकी अनेकांना गंभीर जखमा झाल्याचीही माहिती समोर आली आहे. मृत्यूमुखी पडलेल्या सहा व्यक्तींपैकी तीन महिला आहेत. बहुतांश जखमी व्यक्ती तामिळनाडूच्याच रहिवासी असल्याचंही स्पष्ट झालं आहे. आंध्र प्रदेश सरकारनं या दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

## वनहक्क दावे फेटाळले

उपविभागीय त्यानंतर जिल्हा स्तरावर वन हक्क समिती अंमलबजावणी यंत्रणा कार्यरत आहे. दावे मंजूर करण्यासाठी जिल्हा स्तरावर आठ हजार ४६० दावे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी सहा हजार ६५६ दावे मंजूर करून १३ हजार ३८२ हेक्टर वन जमीन वाटप करण्यात आली. त्यांना सातबारा व प्रमाणपत्रदेखील वाटप केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील प्राप्त दाव्यांपैकी एक हजार ८०४ दावे नामंजूर करण्यात आले आहेत. ७५ वर्षांचा सबळ पुरावा न दिल्याने त्यांचे दावे नामंजूर करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

**वितरीत जमीन विकण्यास बंदी**

सहा हजार ६५६ वन हक्क दावे मंजूर करण्यात आले. त्यांना प्रमाणपत्रही देण्यात आले आहेत. शेती, निवारा व इतर उपजिविकेच्या साधनासाठी जमीनीचा वापर करण्याचा अधिकारी त्यांना देण्यात आल आहे. परंतु वितरीत केलेली जमीन विकण्यास बंदी आहे.

**निवडणुकांअभावी दावे दाखल करण्यास अडचण**

दावे दाखल केल्यानंतर वन हक्क समितीद्वारे त्यांची पडताळण केली जाते. गाव पातळबरोबरच उपविभागीय व जिल्हास्तरावर असलेल्या वन हक्क समितीद्वारे त्याची अंमलबजावणी केली जाते. जिल्हा समितीवर जिल्हा परिषद सदस्य व उपविभागीय स्तरावर पंचायत समितीचे सदस्य असतात. परंतु जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सभापती व सदस्य पदाचा कार्यकाळ संपून दोन वर्षे होत आली आहेत. तरीदेखील या निवडणुका झाल्या नाहीत. त्यामुळे गेल्या दोन वर्षात वनहक्कासाठी एकही दावा दाखल झाला नाही. निवडणुकांभावी दावे दाखल करण्यास अडचणी निर्माण झाल्याची माहिती समोर येत आहे.

## लाचखोर मंडळ अधिकारी जाळ्यात

याने तक्रारदार नागेश तुपे यांच्याकडून जमिनीची फेरफार नोंद मंजूर करण्याकरिता एक लाख रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानूसार ८ जानेवारीला सापळा लावण्यात आला होता. यावेळी केंडे यांनी शेतकऱ्याकडून १ लाख घेताना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडचे पोलीस उप अधीक्षक शशीकांत पाडावे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, पोलीस हवालदार महेश पाटील, सचिन आटपाडकर, सागर पाटील यांनी केली. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाईने महसूल क्षेत्रात खळबळ उडाली आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात पहाटे साडे तीन वाजता गुन्हा नोंद करण्यात आला.

## एनएमसीच्या ठेकेदाराविरोधात पनवेल पालिकेची तक्रार

शेकाप नेते अजित अडसूळे यांनी केलेल्या तक्रारीनंतर पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागाने केलेल्या तक्रारीची दखल घेत नवी मुंबई पालिकेकडून जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता नेमण्यात आलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यातील मोरबे धरणातून नवी मुंबई पालिका हद्दीतील वसाहतीमध्ये पाणी पुरवठा केला जातो. यासाठी वापरण्यात येणाऱ्या जलवाहिन्या जुन्या आणि जीर्ण झाल्याने गळती लागलेल्या या वाहिन्या बदलण्याचे काम सध्या सुरु आहे. या कामासाठी नवी मुंबई पालिकेच्या माध्यमातून ठाणे येथील एसएमसी इन्स्ट्राक्चर कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. नवी मुंबई पालिकेच्या मालकीच्या मोरबे येथील धरणातून टाकण्यात आलेली जलवाहिनी पनवेल पालिका हद्दीतून जात असल्याने पालिका हद्दीतील खारघर ते कोपरा या सायन-पनवेल महमार्गावरील परिसरात जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु आहे. मात्र हे काम करत असताना अडथळा ठरणारे वृक्ष तोडणे जरुरीचे होते.

पनवेल पालिका हद्दीतील हे वृक्ष तोडण्यापूर्वी पनवेल पालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडून परवानगी घेणे अपेक्षित होते. मात्र असे न करता कंत्राटदार कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी वृक्ष तोड केल्याचे निदर्शनास आल्याने पनवेल पालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाच्या वतीने लिपिक विवेक जळे यांनी खारघर पोलीस ठाण्यात एसएमसी इन्स्ट्राक्चर कंपनीचे अनिल मेश्राम तसेच धीरज पाटील यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

या विषयी काही माहिती नसल्याने यावर मी प्रतिक्रिया देणे योग्य होणार नाही असे उत्तर पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले असून, अधिक माहिती घेण्यासाठी उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्याशी सपंर्क साधण्याची सूचना आयुक्त चितळे यांनी केली.

## शिवभोजन केंद्रचालकांवर उपासमारीची वेळ

प्रत्येक महिन्याचे बिल दुसऱ्या महिन्यात अनुदान मिळण्यासाठी पुढे पाठवावे लागते. मात्र तब्बल तीन महिने हे पुढे पाठवले नसल्याने तीन ते चार महिन्याचे अनुदान थकले आहे. पुरवठा विभागाच्या निष्क्रियतेमुळे केंद्र चालकांचे अनुदान थकले असल्याचा आरोप केंद्र चालक करत आहेत.

## परिक्षा केंद्रावर राहणार सीसीटीव्हीची नजर

निर्णयाचं पालकवर्गातून स्वागत होत आहे.

**शाळांकडून शुल्कवाढीची शक्यता**

परीक्षेतील गैरप्रकार ही शिक्षण व्यवस्थेला लागलेली कीड आहे. कॉपी, पेपरफुटी किंवा गुण वाढवून देण्याच्या प्रकारांमुळे अभ्यास करून प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असतो. त्यामुळे मंडळाची भूमिका आणि निर्णय योग्यच आहे. प्रश्न फक्त खर्चाचा आहे. शाळांवर हा भुर्दंड टाकल्यास शाळांकडून शुल्कवाढीची शक्यता आहे. तिचा फटका आपसूकच पालकांना बसणार आहे. त्यामुळे या विषयात शासनाने लक्ष घालून मध्यममार्गी तोडगा काढण्याची आवश्यकता आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली निवासी सदनिका त्याचे विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरूपी खरेदी करण्याकामी तोंडी बोलणी केली असून सदरची निवासी सदरनिकेची मालकी तपासणे कामी तसेच सदरची निवासी सदनिका ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत खात्री करणेकामी वर्तमान पत्रात जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या अनुषंगाने आम्ही खाली वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे बाबत जाहिर नोटीस प्रसिद्ध करित आहोत.

**निवासी सदनिकेचे वर्णन**

मौजे-अलिबाग, ता. अलिबाग नगरपालिका हद्दीतील सि.स.नं. ३६४, ३६४/के, ३६४/१ या मधील नियोजित निरज को. ऑ. हौ. सोसायटी मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०४, क्षेत्रफळ ८७४ फुट, + १०६ ओपन टेरेस मालमत्ता क्र. ALB000001171, जुना मालमत्ता क्र. ZUBM001173 ही निवासी सदनिका या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील विषयांकीत निवासी सदनिकेबाबत कोणाचेही मालकी हक्क, गहाण हक्क, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, साठेकरार वारसा हक्क आदी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क व/किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी. विहीत मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर निवासी सदनिकेच्या खरेदीबाबत निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करतील व मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दि. १०/०१/२०२५

सही/-
**ॲड. राजेश बाळाराम पाटील**
मु. बामणसुरे, पो. चोंढी,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ८०८७९३२८८७/९६८९७७६९६०

## जाहीर हरकत

या जाहीर हरकतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे. | गट क्र. | क्षेत्र (हे आर.) | ७/१२ वरील नावे |
|---|---|---|---|
| शहाबाज | २२५ | ०-८७-०२ | १) चारुशिला अरूण म्हात्रे<br>२) प्रविण हरिश्चंद्र पाटील<br>३) प्रदिप हरिश्चंद्र पाटील<br>४) सीमा शिवराम तायशेटे |

वरील मिळकती याबतीत अलिबाग येथील दिवाणी न्यायालयांत रे.मु. १०/२०२० चा दावा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. कारण सदर मिळकतीत आमचे अशिलांचा १/४ हिस्सा आहे. असे असताना केवळ ७/१२ पत्रकी नावे आहेत या गोष्टीचा गैरफायदा घेवुन ती मिळकत आमचे अशिलांचे चुलत भावांनी त्रयस्थ व्यक्तींना विकण्याच्या तयारीत आहेत अशी देखील माहिती आमच्या अशिलास मिळाली आहे.

तरी या जाहीर हरकतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील मिळकतींमध्ये कोणीही कोणत्याही प्रकारचा भाडेकरार, करारनामा, खरेदी, साठेकरार, दान, गहाण, लिज, बोजा, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणत्याही प्रकारचे करार अगर व्यवहार करू नयेत. तसेच कोणतेही व्यवहार केल्यास अगर हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व अशा प्रसंगी संबंधीत सर्वांना कोर्ट कारवाईस सामोरे जावे लागेल व मग होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी संबंधीत करार करणाऱ्यांवर राहिल याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ०९/०१/२०२५

सही/-
**ॲड. महेश श्रीवर्धन म्हात्रे**
ऑफीस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठरोड, केळकर नाका, अलिबाग,
मोबा.नं. ९२२६८४७०७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मुशेत ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती आमचे आशील यांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी खालीलप्रमाणे नमूद जमीन मिळकतींबाबत अन्य कोणीही इसमाचा संस्थांचा साठेकरार, कूळबंधक, खरेदीसह, मुद्रक, गहाण, तारण, भाडेपट्टी अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालीलप्रमाणे सही करणार वकिलांकडे सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांत कळवावा. सदर मुदतीत कोणत्याही हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर कोणत्याही हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन मौजे मुशेत ता. अलिबाग, जि. रायगड

| गट नं. | क्षेत्र (हे.आ.) | आकार (रू.पै.) | भोक्ताधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १४१ | ०-१५-१०<br>+०-०१-०० (पो.ख.) | ०.३४ | सौ. कल्पना दीपक तरांगे<br>श्री. भक्ति दीपक तरांगे |

अलिबाग
दि- १०-०१-२०२५

**ॲड. सचिन जोशी**
दुसरा मजला, फ्लॅट नं ३,
साईलिला सोसायटी, डॉ. कुमठेकर हॉस्पिटल शेजारी,
श्रीबाग नं. २, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ९८२२६५३६५५

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत विकत घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये बोलणी सुरू आहेत. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलास विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग | १६६/१९०/१९६, १९७/१९८/१६५ | मे. विनायक ४.५०.०० | ४५.०० | प्रमोटर्स पुणे तर्फे भागीदार अतुल महादेव |

तरी वरील बिनशेती मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवाव्यात. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमीची आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०६/०१/२०२५

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

## झाडांची लागवड केव्हा होणार; प्रवासी वर्गाची संपप्त प्रतिक्रिया

# मुंबई-गोवा महामार्गावरील सावली हरपली



**| कोलाड | वार्ताहर |**

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग हा वाहतुकीच्या व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मार्ग असुन या महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी दोन्ही बाजूंना असलेली झाडे तोडण्यात आली आहेत. ही झाडे प्रवाशांसह शेतकरी व वाटसरू यांना सावली देत होती. आता दोन्ही रस्त्याच्या मधोमध फुल झाडे लावण्यासाठी सुरुवात केली आहे. परंतु, सावली देणाऱ्या झाडांची लागवड केव्हा होणार? अशी प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपादरीकरणासाठी या महामार्गाच्या दोन्ही बाजूला प्रचंड मोठ्या प्रमाणात असणारी झाडे तोडण्यात आली आहेत. याला आता १७ वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र, तोडण्यात आलेल्या झाडांच्या लाकडांची विक्री करून लाखो रुपये कमवले; परंतु, तोडण्यात आलेल्या झाडांच्या जागी कोणतीही नवीन झाडे लावण्यात आलेली नाहीत. यामुळे पशु, पक्षी, प्राणी, तसेच प्रवासी वर्गाला मिळणाऱ्या सावलीचा आधार हरपला आहे.

सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कोकणात येणाऱ्या लहान मुलांच्या तोंडावर असणारे 'झुक-झुक झुक-झुक अगीनगाडी.. पळती झाडे पाहु या..' गाण्याचा वृक्ष तोडीमुळे जणू विसर पडला असल्याचे दिसून येत आहे. या वृक्ष तोडीमुळे हळूहळू वातावरणात देखील बदल होत चालले आहे. पूर्वी वेळेवर पडणारा पाऊस, विशिष्ट कालावधीत पडणारी थंडी, उन्हाळा यांमध्ये फरक जाणवू लागला आहे. याचा आरोग्यावर ही परिणाम होऊ लागला आहे. यामुळे वृक्ष लागवड केली नाही तर भविष्यात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागणार असल्याची चर्चा स्थानिक तसेच प्रवासी वर्गात होत आहे.

### आतातरी वृक्ष लागवड करण्यात यावी

**मुंबई-गोवा महामार्गावरील दोन्ही मार्गाचे काम सुरु असुन दोन्ही बाजूच्या मधोमध फुल झाडे लावण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. या फुलझाडांना पाणी घालण्याचे काम देखील केले जात आहे. याबरोबर रस्त्याच्या दोन्ही बाजूला सवाली देणारी झाडे लावण्याचे काम सुरु केले असते प्रवासी वर्गाला त्यांच्या सावलीचा आधार झाला असता. परंतु, नियोजन शुन्य असल्यामुळे अशा गोष्टींकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे जर १७ वर्षांपूर्वी केले असते तर आजपर्यंत या महामार्गावर निसर्ग फुलला असता. यामुळे आतातरी वृक्ष लागवड करण्यात यावी, अशी मागणी वाटसरू तसेच प्रवासी वर्गातून केली जात आहे.**

# नागांवमध्ये दिडशे रक्तदात्यांनी केले रक्तदान





**| अलिबाग | शहर प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज संस्थान नागांव व आक्षीच्या माध्यमातून नागांव ग्रुप ग्रामपंचायतीच्या सभागृहात महारक्तदान शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.८) करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून एकूण १५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी, मा.जि.प. सदस्य द्वारकानाथ नाईक, नागांव सरपंच हर्षदा मयेकर, आक्षी सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, जिल्हा डॉक्टर असो.चे अध्यक्ष निशिगंध आठवले, डॉ. मकरंद आठवले, डॉ. सुहानी आपटे यांच्यासह सचिन राऊळ, सांप्रदाय तालुका अध्यक्ष उदय पेंडणेकर, दिनेश पाटील, लावण्या निकम, मयुर गरूड, नितेश राऊत, सुजाता चोरघे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, रक्दान करणाऱ्या रक्तदात्यांना रायगड हॉस्पिटल रक्त पेढी तर्फे गौरवपत्र देण्यात आले.

हे रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी नागांव, खारगल्ली व आक्षी सेवाकेंद्रातील अध्यक्ष विकास राऊत, प्रेरणा पाटील, सुनिल मानकर, राजेंद्र नाईक, संजय पाटील, मंगेश ठाकूर, संजय मयेकर, रिता म्हात्रे, राजश्री पाटील, जयवंती गुरव, रजनी काठे, अध्यक्ष शरद भगत, दिपक फाळके, वासुदेव सारंग, रमन पाटील, गीता कवळे आदींनी विशेष मेहनत घेतली.

# नागांव हायस्कुलचे घवघवीत यश

**| अलिबाग | शहर प्रतिनिधी |**

आवास येथील बा.ना. हायस्कूल शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन दि.२ व ३ जानेवारी रोजी करण्यात आले होते. या प्रदर्शनात नागांव हायस्कूलमधील इ. सहावी व आठवीच्या गटात प्रश्नमंजुषा स्पर्धेत सनाया भुकवार व काव्या शहाबाजकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच, इ.९वी ते १२वीच्या गटात विज्ञान प्रतिकृतीमध्ये राधिका वर्तक, कार्तिकी कवळे व कार्तिक पाटील यांनी तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच, या प्रतिकृतीची निवड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशासाठी जान्हवी बनकर, मंजुषा पाटील, सुप्रिया पाटील, मोहन पाटील, गिरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक मुख्याध्यापक ए.जी. पाटील, तनिष्का नाईक, वर्षा पाटील, मनोज कासार, संस्थेचे पदाधिकारी व शिक्षेकेतर कर्मचारी यांनी केले.



# पन्नास टक्के जागा राखीव ठेवा

## बहुजन विद्यार्थी संघटनेची मागणी

**| पाली/बेणसे | वार्ताहर |**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये आरक्षित जागांमधून अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात, अशी मागणी बहुजन विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांनी महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण आयुक्तांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा कायदा अधिनियम २००९ नुसार खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. या जागेवर वंचित व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला



जातो. वंचित घटकातील पालकांना जातीच्या दाखल्याची अट असते, तसेच आर्थिक दुर्बल घटकातील पालकांना १ लाख रुपयाच्या आतील उत्पन्नाच्या दाखल्याची अट असते. परंतु, सर्रास ९० टक्क्यापेक्षा जास्त आर्थिक दुर्बल घटकातील पालक हे उत्पन्न कमी दाखवून बनावट उत्पन्नाचा दाखला बनवून घेतात. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच खाजगी शाळांमध्ये २५% आरक्षित जागेमध्ये प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांत आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी जवळपास ९०% टक्के दिसून येतात. उरलेल्या १० टक्क्यांवर अनुसूचित जाती जमातीचे विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रभर पाहायला मिळतात.

खोटे उत्पन्नाचे दाखले बनवून २५ टक्के आरक्षित जागा बळकावल्या जात असून त्याकडे राज्याचे शिक्षण विभाग पूर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप अनिल वाणी यांनी केला आहे. या दाखल्यांची पडताळणी करूनच प्रवेश देण्यात यावा, असेही अनिल वाणी यांनी म्हटले आहे.

# वाचन कल्पनाशक्ती वाढवते : डॉ. चंद्रकांत मढवी



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

ज्या व्यक्तीला आयुष्यात यश आणि आत्मसन्मान प्राप्त करायचा आहे. त्यांनी पुस्तक वाचन करायला पाहिजे. कारण वाचन कल्पनाशक्ती वाढवते. तसेच, वाचन व्यक्तीच्या शक्तीला योग्य दिशा प्राप्त करून देते. व्यक्तीमध्ये धैर्याचा संचार करते. वाचनामुळे आपल्या ज्ञानात भर पडते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक प्रा. चंद्रकांत मढवी यांनी केले आहे.

पनवेल येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या सरस्वती कक्षात वाड्मय मंडळातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत वाचक लेखक परिसंवाद या कार्यक्रमाचे बुधवारी (दि. ८) आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. मढवी बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रमा भोसले यांनी भूषविले होते. यावेळी प्रा. डॉ.बी.जी. खाडे, मनोज भावर, रोहन भोईर, आरती नखाते, कार्तिकी सोनटक्के तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. रमा भोसले यांनी भाषणात वाड्मय संस्कृती जोपासली गेली पाहिजे. समाजातील सर्वच लोकांशी वागण्याची कला वाचनाने अवगत होते. वाचनामुळे आपण ज्ञान संपादन करतो. आपली विचारशक्ती वाढते आणि आपल्याला चांगल्या गोष्टीची प्रेरणा मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक बी.जी. खाडे यांनी केले. तर, रोहन भोईर यांनी लेखकांचा परिचय दिला. प्रा. डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे छात्राध्यापक यांच्यात प्रश्नोत्तर व चर्चा रंगली. सूत्रसंचालन व पसायदान श्रीमती कार्तिकी सोनटक्के यांनी केले. तर, श्रीमती आरती नखाते यांनी आभार व्यक्त केले.

# सोन्याची चेन चोरीला

**| पनवेल | वार्ताहर |**

पनेवल शहरातील लाईनआळी येथे राहणारे ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक यांची सोन्याची चेन लांबविल्याची घटना घडली आहे. जेष्ठ नागरीक आपली टपरी उघडून टपरीची साफसफाई करत असताना तेथे मोटार सायकलवरुन एक इसम आला. त्याने त्या जेष्ठ नागरिकासमोर नोटांचे बंडल काढून त्यातील ५०० ची एक नोट आणि १०० च्या ५ नोटा काढल्या आणि त्या मंदिरात जाऊन दान करा, असे सांगितले.

तसेच, या नोटांवर तुमच्याकडील सोन्याचे दागिने ठेवा असे सांगताच त्यांनी गळ्यातील सोन्याची चेन काढून त्याच्याकडे दिली. आरोपीने हातचलाखीने नोटेवर सोन्याची चेन ठेवल्यासारखे केले आणि रब्बर लावून नोटांची पुडी पिशवीत टाकण्याचा बहाणा करून पिशवी त्या वृद्ध इसमाच्या हातात दिली. आणि ५ मिनिटाने नोटांची पुडी उघडा, असे सांगितले. जेव्हा त्या वृद्धाने पिवशीत पाहिले तेव्हा त्यात चोरट्योन हातचलाखीने नोटांसह ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन पळवून नेल्याचे लक्षात आले. त्यांनी याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबीर

**| पनवेल | प्रतिनिधी |**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल, पनवेल महानगरपालिका आरोग्य विभाग आणि के.व्ही.कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'चेरी ब्लॉसम' या प्रकल्पांतर्गत शाळेतील विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला शेकाप रायगड जिल्हा खजिनदार प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली.



शाळेतील विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारे आरोग्य विषयक शिबीर घेणे गरजेचे आहे. त्यासाठी या संस्थांनी पुढाकार घेतला आहे. त्याबद्दल शाळा कमिटी चेअरमन म्हणून प्रीतम म्हात्रे यांनी त्यांचे आभार मानले आहेत. तसेच, शाळेच्या विद्यार्थिनींची आरोग्य विषयक काळजी घेताना अशा प्रकारे भविष्यातही आरोग्य विषयक शिबीर आयोजित करण्याचा मानस असल्याचे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले आहे. यावेळी डॉ. गिरीश गुणे, डॉ. अमोद दिवेकर, डॉ. हितेन शहा व पनवेल मधील प्रतिष्ठित डॉक्टर उपस्थित होते.

## निवडक



### पाण्याच्या वाहिनीचे काम अपूर्णावस्थेत

**उरण :** तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याच्या पाईप लाईनचे काम सुरू आहे. मात्र, तालुक्यात आजही अनेक कामे निकृष्ट दर्जाची व अपूर्णावस्थेत आहेत. याबाबत खोपटे गावातील तरुणांनी जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांची भेट घेऊन त्यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले आहे. खोपटे गावाच्या मुख्य पाण्याच्या वाहीनीचे जलजीवन मिशन अंतर्गत चालू असलेले काम आजतागायत पूर्ण झालेले नाही. याबाबत गावातील तरुणांनी डॉ. भरत बास्टेवाड यांची त्यांच्या अलिबाग कार्यालयात भेट घेऊन त्यांच्यासमोर या समस्या मांडल्या. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्वरित उरण मधील त्यांच्या अधिकारी रुपाली म्हात्रे यांच्याशी मोबाईल द्वारे चर्चा करून हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सांगितले आहे.



### रोह्यात वणव्याने उडाला हाहाकार

**खांब** : रोहा तालुक्यातील खांब ते पालदाड मार्गावरील धानकान्हे-चिल्हे गावाजवळील शेतात वणवा लागल्याची घटना घडली आहे. भर दुपारच्या सुमारास अज्ञाताने लावलेल्या आ-गीचे रूपांतर वणव्यात झाल्याने सर्वत्र एकच हाहाकार उडाला होता. भर दुपारच्या सुमारास धानकान्हे-चिल्हे गावाच्या हद्दीतील शेती क्षेत्रात कोणी अज्ञाताने वणवा लाऊन दिला होता. प्रखर ऊन आणि वाऱ्याच्या झोताबरोबर बघता बघता वणव्याची व्याप्ती पसरू लागली. याची झळ बागायती शेती व कडधान्ये पिकाला लागल्याने पिकेही होरपळून गेली. तर, शेतकरी वर्गाने गुरांसाठी साठवलेला चाराही जळून खाक झाल्याने शेतकरी वर्गाला फार मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे.

### पनवेलमधील कॉलनी फोरमची 'ब्लिंक इट'वर धडक

**पनवेल :** डिलिव्हरीसाठी काम करणाऱ्या गिग रायडर्सवर होणाऱ्या अन्याय विरोधात गुरूवारी (दि.९) शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या लीना गरड यांच्या नेतृत्वाखाली 'ब्लिंक इट' व्यवस्थापनावर धडक देण्यात आली. आपल्या कामाचा योग्य मोबदला न मिळाल्यामुळे ब्लिंक इट कंपनीच्या डिलिव्हरी बॉईजवर अन्याय होत आहे. या अन्याय विरोधात या सर्व गीग रायडर्सने कॉलनी फोरम अध्यक्षा लीना गरड यांची भेट घेऊन या संदर्भात मदत करण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. कॉलनी फोरमने गिग राईडर्सची समस्या समजून घेऊन तातडीने कामोठे येथील ब्लिंक इट स्टोअरवर धडक देत ब्लिंक इट व्यवस्थापनाला धारेवर धरले. सर्व रायडर्सना डिलिव्हरी साठी योग्य मोबदला मिळाला पाहिजे, तसेच रायडर्सला कामाचे तास ठरवून देण्यात यावे आणि त्यानुसार त्यांना प्रत्येक तासाला किमान शंभर रुपये मोबदला देण्यात यावा, अशा मागण्या यावेळी गिग रायडर्सच्यावतीने करण्यात आल्या.



### विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून जाऊ नका : डॉ. घरत

चिरनेर : इंटरनेटच्या युगात पालक त्यांच्या कामात गुंतलेले आहेत. अशावेळी शिक्षकांवरील जबाबदारी वाढली आहे. नवी पिढी घडविण्याचे काम करणाऱ्या शिक्षकांनी आता अधिक जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन मानव विकास संस्थेचे अध्यक्ष तथा डॉ. सुभाष घरत यांनी केले आहे. आवरे येथील ज्ञानप्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षक मित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुलनात दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना दहावी बारावी नंतर पुढे काय? या विषयावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी घरत हे मार्गदर्शनपर भाषणात प्रमुखवक्ते म्हणून बोलत होते. यावेळी प्राचार्य सुभाष ठाकूर, उपशिक्षक शरद केणी, राजेंद्र शिंदे, शिवहरी गावंड, देवेश म्हात्रे, शेखर म्हात्रे तसेच अन्य शिक्षक उपस्थित होते. पुढे बोलताना सुभाष घरत यांनी परीक्षा पास झाल्यानंतर कोणकोणते अभ्यासक्रम आहेत, तसेच अभ्यासक्रम प्रवेश पात्र परीक्षा कोणत्या आहेत. आणि अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर कोणत्या सेवासंधी उपलब्ध होत असतात. याविषयीचे सखोल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी स्वत:च्या जीवनातील अनेक अनुभव सांगून विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून जाऊ नका. अनेक मार्ग आहेत. प्रयत्न केले तर मार्ग सापडतो, असे सांगितले.

## अवैध मासेमारीवर बसणार लगाम | स्ट्रिमींगचा पुरावा म्हणून वापर करणार

# सागरी सुरक्षेवर नजर ठेवणारे ड्रोन सज्ज

**| रायगड | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्याच्या जलधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना केल्या आहेत. अत्याधुनिक ड्रोन प्रणालीद्वारे सागरी सीमांवर नजर ठेण्यात येणार असून या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या पहिल्या नियंत्रण कक्षाचे उद्घाटन मस्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे झाले. यावेळी अलिबागजवळ वरसोली बीच येथे जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी डॉ.भरात बास्टेवाड यांच्या उपस्थितीत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते ड्रोन प्रणालीला हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले. त्याचबरोबर श्रीवर्धन तालुक्यातील मूळगाव जेट्टीवरून देखील ड्रोन प्रणालीचे उड्डाण करण्यात आले आहे. यावेळी तेथे कोस्टगार्ड विभागाचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांच्यासह अलिबाग येथील मत्स्य सहकारी संस्थांचे, संघाचे प्रतिनिधी, नौका मालक उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्याच्या जलधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन सुधारीत कायदा अंमलात आणला आहे. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता विभागाकडे असलेल्या गस्ती नौकांमार्फत गस्त घालून कार्यवाही करण्यात येत असते. गस्ती नौकेद्वारे समुद्रात गस्त घालत असताना प्रत्येक नौकेची तपासणी करणे शक्य होत नाही, तसेच अनधिकृत नौकांचा पाठलाग करीत असताना त्या पळून जात असतात. अशा नौकांना पकडणे जिकरीचे होत असते.

रायगडसह कोकणातील सात जिल्ह्यात अत्याधुनिक ड्रोन प्रणालीद्वारे सागरी सीमांवर नजर ठेवण्यात येणार आहे. गस्ती नौके सोबतच राज्याच्या जलधी क्षेत्रात नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर केल्यास अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांची पुराव्यासह माहिती विभागास उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. अशा नौकांवर सागरी कायद्यांतर्गत कठोरपणे कारवाई करणे सोईचे होईल. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळेस अधिकचे क्षेत्र ड्रोनद्वारे देखरेखीखाली येण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वापर करुन मासेमारी नौकांची करुन झाल्यावर अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती विभागास सुलभरित्या उपलब्ध होऊ शकेल, ड्रोनद्वारे राज्याच्या किनारपट्टीवरील क्षेत्र देखरेखीखाली येणार असल्याने हे ड्रोन सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार आहेत, जेणेकरुन सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होईल.

या ड्रोन प्रणालीद्वारे अनाधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांवर नजर ठेवून अशा नौकांची माहिती पुराव्यासह उपलब्ध करून कार्यवाही करण्याकरिता ड्रोन प्रणालीच्या स्ट्रिमींगचा पुरावा म्हणून वापर करण्यात येणार आहे.

# आयुष जाधवचे यश



**| पाली-सुधागड | वर्ताहर |**

पंचायत समिती शिक्षण विभाग, विज्ञान गणित अध्यापक मंडळ व श्री राज एज्युकेशन सेंटर इंग्रजी माध्यम शाळा घोटवडे यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यता आले होते. ही स्पर्धा दि.२ व ३ जानेवारी या कालावधीत पार पडली. या प्रदर्शनात ग. बा. वडेर हायस्कूल व वसंतराव ओसवाल कनिष्ठ महाविद्याल पाली येथील इयत्ता ११ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी आयुष विजय जाधव याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्यामुळे सर्वस्तरावरून आयुषचे कौतुक करुन अभिनंदन करण्यात येत आहे. यावेळी, आयुष जाधावने फायर फायटिंग रोबोटीक कार बनवून प्रदर्शन केले होते.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# शीशे के घरों में रहनेवाले..

'शीशे के घरों में रहनेवाले दूसरों के घरों पर पत्थर नही फेका करते', हा राजकुमार या नटाचा संवाद फार प्रसिद्ध आहे. तो आता बदलायला हवा. आता तो, 'जिनको दूसरों के घरों पे पत्थर मारने ही है वे शीशमहल में नही रहा करते' असा करायला हवा. दुसऱ्यांच्या घरावर दगड मारायचेच असतील तर आपण रस्त्यावरच राहावे लागते, काचेच्याच काय कुठल्याच घरात राहून चालत नाही याचा प्रत्यय दिल्लीच्या राजकारणात सध्या येतो आहे. तेथे फेब्रुवारीत विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. त्यामुळे पुन्हा एकवार भाजप आणि आम आदमी पक्ष किंवा आप यांच्यातला संघर्ष सुरु झाला आहे. भाजपचे प्रचारसम्राट (आणि तरीही लोकसभेच्या अपयशाचे धनी) नरेंद्र मोदी यांच्या दोन सभा झाल्या आहेत. त्यांनी सालाबादप्रमाणे आप म्हणजे पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र आहे एवढेच म्हणायचे बाकी ठेवले आहे. आप ही आपदा आहे, दिल्लीकरांची गेली दहा वर्षे फुकट गेली वगैरे टीका त्यांनी केली. त्यातच त्यांनी केजरीवाल यांच्या बंगल्याचा उल्लेख केला. या बंगल्याला भाजप शीशमहल असे म्हणतो. वास्तवात हा काही आरसेमहाल वगैरे नाही. मात्र त्याच्यावर प्रचंड खर्च झाल्याची चर्चा आहे. बरोबर मोदींच्या भाषणाच्या अगोदर या बंगल्याच्या खर्चाबाबत सरकारी ऑडिटर उर्फ कॅगचा अहवाल फुटून नेमका वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होईल याची व्यवस्था केली गेली. मोदींनी आपल्या भाषणात याच बातम्यांचा हवाला दिला. बंगल्याचा मूळ खर्च साडेसात लाख कोटी इतका अपेक्षित असताना प्रत्यक्षात त्यावर ३३ कोटी व काहींच्या मते चाळीस कोटी रुपये खर्च केले गेले. हा पैसा वाह्यातपणे कसकसा खर्च केला गेला, एलईडी टीव्ही, ओव्हन, फर्निचर, बाथरुममधील सोयी इत्यादींवर मूळ अंदाजाच्या कित्येक पटीने लाखो रुपये कसे उडवले गेले इत्यादी तपशील या बातम्यांमध्ये आकडेवारीनिशी आहे. वास्तविक कॅगचा हा अहवाल अजून अधिकृतरीत्या प्रसिध्द झालेला नाही. तो विधिमंडळ किंवा संसदेत मांडण्यात आलेला नाही. अशा वेळी तो नेमका ऐन प्रचारापूर्वी भाजपच्या आदेशावरूनच फोडण्यात आला हे स्पष्ट आहे.

### कॅग अहवालाचे राजकारण

आता कदाचित हा कॅग अहवाल लिहिणाऱ्या ऑडिटरला निवृत्तीनंतर सरकारी महामंडळ किंवा संस्थेवर नियुक्ती दिली जाईल. कदाचित राज्यसभेतही पाठवले जाईल. कारण, या अहवालाच्या आधारे भाजपला दिल्ली निवडणुकीचा सगळा प्रचार फिरवता येणार आहे. आणि, हे सगळे ठरवून केलेले कारस्थान असावे असे मानण्यासाठी पुरेसे पुरावेही आहेत. भाजपने या तथाकथित शीशमहलच्या प्रतिकृती करून घेतल्या असून त्या येत्या वीस दिवसात प्रचारादरम्यान सर्व शहरभर फिरवल्या जाणार आहेत. हजार शब्दांपेक्षा एक चित्र प्रभावी असते. त्यानुसार मोदींच्या दहा भाषणांपेक्षा हे ४० कोटी रुपयांचे काचेचे घर जनतेला दाखवून केजरीवालांच्या नैतिकतेची काचेसारखी अब्रू फोडून टाकणार आहेत. केजरीवाल व आम आदमी यांच्याकडे या आरोपाचा उत्तर देण्यासाठी भक्कम प्रतिवाद दिसत नाही. केजरीवालांचे आजवरचे राजकारण पाहता त्यांनी खरे तर, या प्रकरणात एक पैशाचाही भ्रष्टाचार झाला असेल तर मी संन्यास घेईन असे म्हणायला पाहिजे होते. पण ते आणि आम आदमी पक्ष आता मोदींच्या बंगल्यावर किती खर्च झाला, मोदी किती महागडे सूट, शाली किंवा वस्तू वापरतात याचे आकडे देत आहेत. पण जनतेवर याचा परिणाम होईल असे वाटत नाही. उलट, केजरीवाल यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले म्हणून ते मोदींवर टीका करीत आहेत असा त्याचा अर्थ काढला जाईल. हेच केजरीवाल २०१२ पासून काँग्रेसच्या मुख्यमंत्री शीला दीक्षित आणि पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्यावर वाटेल ते आरोप करीत होते. त्यावेळी त्यांनी कॅग किंवा अशाच कोणकोणत्या अहवालांचा हवाला दिला होता. सिंग सरकारवर कोळसा खाणींची कंत्राटे किंवा मोबाईल कंपन्यांचे परवाने देताना वाटेल ते आरोप झाले. त्यात लाखो कोटींचा घोटाळा झाल्याचे निष्कर्ष कॅगने काढले होते. पुढे हे निष्कर्ष बोगस असल्याचे स्पष्ट झाले. मोदी सरकारने दहा वर्षांच्या काळात त्याबाबत छटाकभर देखील कारवाई केली नाही.

### कार्यकर्त्यांसाठी धडा

याचा अर्थ कॅगचे अहवाल सरसकट चुकीचे वा खोटे असतात असे नव्हे. पण ते एकाच रीतीने विचार करणारे असू शकतात. शिवाय त्यांच्यातले हवे तेवढे निष्कर्ष काढून घेऊन त्यांचे राजकारण केले जाऊ शकते. तेव्हा केजरीवालांनी हे केले. आता तर काय सगळी यंत्रणा भाजपच्या दिमतीला आहे. त्यामुळे बरोबर प्रचाराच्या हंगामात हा अहवाल फोडण्यात आला आहे. गेली दहा वर्षे दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार आहे. ऐन मोदी लाटेनंतरही २०१५ मध्ये दिल्लीत केजरीवाल यांनी अभूतपूर्व विजय मिळवला. २०२० मध्ये त्याची पुनरावृत्ती केली. मोदी सरकारने त्यांच्या सरकारचे जिणे हराम केले. त्यांचे सर्व अधिकार काढून ते नायब राज्यपालांना दिले. केजरीवाल सरकारातील सचिव मंडळी देखील भाजपच्या बाजूने बोलतील अशी व्यवस्था केली. नंतर मनिष सिसोदिया आणि केजरीवालांना दारु घोटाळ्यावरून तुरुंगात टाकले. दारु घोटाळ्यात भाजपला काहीही सिध्द करता आले नाही. शिवाय आम आदमीच्या फुकट वीज, फुकट पाणी अशा योजनांमुळे तो पक्ष दिल्लीकरांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. तेथील प्राथमिक आरोग्य केंद्रे व सरकारी शाळांचा दर्जा उत्तम आहे हे सर्व जण मान्य करतात. अशा स्थितीत केजरीवाल यांची वैयक्तिक नालस्ती करणे हाच एक मार्ग भाजपपुढे होता. तशी संधी केजरीवाल यांनी त्यांच्या बंगल्याच्या बांधकामाच्या निमित्ताने आयती भाजपच्या हातात दिली आहे. हेच केजरीवाल एकेकाळी सरकारी बंगला वा गाडी घेणार नाही असे म्हणत होते. अनेक दिवस ते खरोखरच साध्या फ्लॅटमध्ये राहत होते. पण गेल्या पाच वर्षात त्यांचे रुप बदलले आहे. बहुदा, इतर राज्यांमध्ये पक्षाचा विस्तार करण्याच्या महत्वाकांक्षेने पछाडल्यामुळे त्यांचेही वर्तन इतर राजकीय पक्षांसारखेच होऊ लागले. दारु मुबलक, सर्वत्र व दिवसरात्र उपलब्ध करून देण्याचे धोरण ही त्याची पहिली चुणूक होती. आता त्यांनी कितीही प्रयत्न केला तरी चाळीस कोटींचे घर हे किटाळ त्यांना सहजी दूर करता येणे कठीण आहे. येत्या निवडणुकीत त्यांना त्याचा फटका बसलेला दिसेल. ज्यांना खरोखर भ्रष्टाचाराविरुध्द लढायचे असेल वा व्यवस्था बदलायची असेल त्यांना आपल्या आचरणाबाबत किती जपावे लागते हे या उदाहरणावरून दिसेल.

विचार

# नेपाळ मालामाल, अमेरिका कर्जबाजारी!

**सरत्या आठवड्यात अर्थजगत चांगलेच गजबजलेले राहिले. मात्र तीन खास बातम्यांनी सगळ्यांचे लक्ष वेधले. पहिली बातमी म्हणजे भारताला वीज पुरवून नेपाळ मालामाल होतो आहे. त्याबद्दलची माहिती नुकतीच समोर आली. दरम्यान, अमेरिका जगात सर्वाधिक कर्जबाजारी देश असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास महाकुंभ मेळ्यामुळे अर्थकारणाला कशी गती मिळत आहे, हे पहायला मिळाले.**



सरत्या आठवड्यात अर्थजगत चांगलेच गजबजलेले राहिले. मात्र तीन खास बातम्यांनी सगळ्यांचे लक्ष वेधले. पहिली बातमी म्हणजे भारताला वीज पुरवून नेपाळ मालामाल होतो आहे. त्याबद्दलची माहिती नुकतीच समोर आली. दरम्यान, अमेरिका जगात सर्वाधिक कर्जबाजारी देश असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास महाकुंभ मेळ्यामुळे अर्थकारणाला कशी गती मिळत आहे, हे पहायला मिळाले.

भारताचा शेजारी देश नेपाळ काही महिन्यांपासून भारताला मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा करत आहे. नेपाळ विद्युत प्राधिकरण (एनई) नुसार, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या पाच महिन्यांमध्ये नेपाळने १३ अब्ज नेपाळी रुपये किंवा सुमारे ८१५ कोटी भारतीय रुपयांची वीज निर्यात केली आहे. नेपाळ गेल्या काही वर्षांपासून पावसाळ्यात भारताला अतिरिक्त वीजपुरवठा करत आहे. 'एनईए' अधिकाऱ्यांच्या मते, या पाच महिन्यांमध्ये भारताला निर्यात केलेल्या विजेचा सरासरी दर ७.३९ नेपाळी रुपये म्हणजेच अंदाजे ४.६३ भारतीय रुपये प्रति युनिट इतका आहे. द्विपक्षीय मध्यम मुदतीच्या वीज विक्री करारांतर्गत नेपाळ हरियाणा आणि बिहारला दैनिक ऊर्जा विनिमय आणि रिअल टाईम बाजार किमतीवर वीज विकते. या कराराअंतर्गत विकल्या गेलेल्या विजेतून नेपाळला अंदाजे ८१५ कोटी रुपये मिळाले. हे सर्व व्यवहार भारतीय चलनात झाले. हिवाळ्याच्या आगमनाबरोबरच कोरडा हंगाम आला आहे. त्यामुळे नेपाळने आता भारताला वीजपुरवठा करणे थांबवले आहे. आता नेपाळने भारताकडून वीज आयात करण्यास सुरुवात केली आहे.

सध्या नेपाळअंतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी भारताकडून ३०० मेगावॉट वीज आयात करतो. नेपाळमधील बहुतेक वीज प्रकल्प हे 'रन-ऑफ-रिव्हर' प्रकारचे आहेत, ज्यांना हंगामी चढउतारांचा सामना करावा लागतो. 'एनई' अधिकाऱ्यांच्या मते नेपाळने या वर्षी भारताला अधिक वीज निर्यात करण्याची योजना आखली होती; परंतु सप्टेंबरमध्ये पूर आणि भूस्खलनामुळे ४५६ मेगावॉटच्या तामाकोशी जलविद्युत प्रकल्पाला झालेल्या हानीमुळे तसे करता आले नाही. या वर्षापासून नेपाळने भारताच्या ट्रान्समिशन लाइनद्वारे बांगलादेशला ४० मेगावॅट वीज निर्यात करण्यास सुरुवात केली आहे. वीज विक्री करारांतर्गत, नेपाळला आतापर्यंत २८ प्रकल्पांमधून निर्माण झालेली ९४१ मेगावॉट वीज भारतीय बाजारपेठेत विकण्यासाठी मंजुरी मिळाली आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. जगावरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत आहे. जगातील देशावरील कर्ज हे १०२ ट्रिलियन डॉलरवर पोहोचले आहे. 'वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्स'ने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या हवाल्याने कर्जदार देशांची यादी शेअर केली आहे. यामध्ये अमेरिकेवर सर्वाधिक कर्ज आहे, तर चीन आणि जपान दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. भारतावर जगातील एकूण कर्जाच्या ३.२ टक्के कर्जाचा वाटा आहे. अमेरिका हा सर्वात मोठा कर्जदार देश आहे. 'वर्ल्ड ऑफ स्टॅटिस्टिक्स'ने जाहीर केलेल्या आकडेवारी पाहिली, तर सध्या जगावर एकूण १०२ ट्रिलियन डॉलर्सचे कर्ज आहे. त्यात सर्वात जास्त कर्ज हे अमेरिकेवर आहे. अमेरिकेवर ३६ ट्रिलियन डॉलर्सचे कर्ज आहे. जे जागतिक कर्जाच्या ३४.६ टक्के आहे. ड्रॅगनची अवस्थाही बिकट आहे. चीन हा जगातील दुसरा सर्वात मोठा कर्जदार देश आहे. चीनवर १४.६९ ट्रिलियन डॉलर्सचे प्रचंड कर्ज आहे. जे संपूर्ण जगाच्या कर्जाच्या १६.१ टक्के आहे. कर्जाच्या बाबतीत अमेरिका आणि चीननंतर जपान तिसऱ्या क्रमांकावर आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते, जगातील एकूण कर्जापैकी १० टक्के कर्ज जपानवर आहे. अहवालानुसार, ते सुमारे १०.८० ट्रिलियन डॉलर्सपर्यंत वाढले आहे. कर्जाच्या बाबतीत ब्रिटन चौथ्या क्रमांकावर आहे. जे जागतिक कर्जाच्या ३.६ टक्के आहे. याशिवाय फ्रान्स पाचव्या क्रमांकावर आहे. या देशावर कर्जाचा वाटा हा ३.५ टक्के आहेत, तर इटली कर्जाच्या बाबातीत सहाव्या क्रमाकांवर आहे. कर्जाचा वाटा हा ३.२ टक्के आहे.

कर्जाच्या बाबतीत भारत सातव्या क्रमांकावर आहे. टॉप-१० यादीत भारतावर अमेरिकेपेक्षा दहापट कमी कर्ज आहे. जगातील एकूण कर्जामध्ये भारताचा वाटा ३.२ टक्के आहे. यानंतर जर्मनी (२.९ टक्के), कॅनडा (२.३ टक्के), ब्राझील (१.९ टक्के) यांचा समावेश आहे. तर जीडीपी गुणोत्तराच्या दृष्टीने पाहिले तर कर्जदार देशांची ही यादी खूपच वेगळी दिसेल. दरम्यान, भारतीयांवर दिवसेंदिवस कर्जाचा बोजा वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. ग्रामीणसह शहरी भागातील जनता कर्जाच्या विळख्यात अडकली आहे. यामध्ये ग्रामीण भागातील प्रमाण शहरी भागापेक्षा जास्त आहे. अहवालात दिलेल्या माहितीनुसार, १ लाख लोकांमागे १८ हजाराहून अधिक लोक कर्जबाजारी आहेत. दरम्यान, प्रयागराज येथे जानेवारीत होणारा महाकुंभ मेळा हा भारतातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा धार्मिक उत्सव असेल.

हा सण धर्मासाठी तसेच अर्थशास्त्रासाठी खूप खास असणार आहे, कारण या काळात अनेक व्यवसायांना कमाईच्या संधी मिळतील. प्रयागराजमध्ये दर १२ वर्षांनी महाकुंभ मेळा साजरा केला जातो. या वेळी १३ जानेवारी (पौष पौर्णिमा) ते २६ फेब्रुवारी (महा शिवरात्री) या कालावधीत साजरा केला जात आहे. १३ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रयागराजला भेट दिली आणि मेळ्यासाठी शहराच्या सुविधा आणि पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी एकूण साडेपाच हजार कोटी रुपयांच्या बांधकाम प्रकल्पांचा शुभारंभ केला. त्यापूर्वी त्यांनी संगम येथे पूजाही केली. दर १२ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभमेळ्यासाठी लाखो यात्रेकरू आणि पर्यटक यजमान शहराला भेट देतात. असा अंदाज आहे की २०२५ मध्ये ४०-५० कोटी पर्यटक प्रयागराजमध्ये येतील. त्यामुळे तेथील स्थानिक अर्थव्यवस्थेला लक्षणीय चालना मिळेल.

महाकुंभ मेळ्याच्या धार्मिक महत्त्वाव्यतिरिक्त अन्य कार्यक्रमांमुळे रोजगारनिर्मिती आणि पर्यटनाद्वारे आर्थिक विकासाला चालना मिळते. त्यामुळे जवळपासच्या कंपन्यांना फायदा होतो आणि संपूर्ण भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते. महाकुंभ दरम्यान, लाखो लोक या तीर्थक्षेत्रांना भेट देतात. कुंभमेळ्यातील निवासाची मागणी वाढते. ही वाढ ट्रॅव्हल एजन्सी, निवास सुविधा, भोजनालये आणि टूर ऑपरेटर्सना मदत करते. कुंभमेळ्यात तंबू भाड्याने देण्यासारख्या सेवांना, जे सणासुदीच्या ठिकाणाजवळ अतिथींना सुलभ आणि आकर्षक निवास पर्याय प्रदान करतात, त्यांनाही जास्त मागणी आहे. पर्यटन व्यवसायात हवाई, रेल्वे आणि रस्ते वाहतुकीसाठी आरक्षणामध्ये झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे सर्व उद्योगक्षेत्रांसाठी उत्पन्नाचा मोठा स्रोत निर्माण होतो. बांधकाम, सुरक्षा, आरोग्यसेवा आणि कार्यक्रम नियोजन यासारख्या उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात तात्पुरत्या आणि कायमस्वरूपी कामाच्या संधी निर्माण करून महाकुंभ या क्षेत्रातील बेरोजगारी कमी करते. लहान व्यवसाय आणि कारागीरांना त्यांच्या वस्तू विकण्याची उत्तम संधी आहे. त्याचा स्थानिक समुदायांनाही फायदा होतो. स्थानिक व्यवसायांना पाठिंबा देण्यासाठी यात्रेकरू मोठ्या प्रमाणात अन्न, कपडे, धार्मिक वस्तू आणि स्मृतिचिन्हे खरेदी करतात.

वैयक्तिक विक्रेत्यांना मदत करण्याव्यतिरिक्त हा विस्तार स्थानिक पाककृती, कला आणि हस्तकला यांची मागणी निर्माण करून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतो. गेल्या वेळी एक लाख कोटी रुपयांचा व्यवसाय झाला होता. 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री' (सीआयआय) च्या आधीच्या अंदाजानुसार २०१९ च्या कुंभमेळ्याने एकूण १.२ लाख कोटी रुपयांची कमाई केली होती तर २०१३ मधील मागील महाकुंभाने हॉटेल्स आणि विमानतळाच्या पायाभूत सुविधांच्या सुधारणांसह एकूण १२,००० कोटी रुपयांची कमाई केली होती.

चर्चा आजची

# रायगड जिल्ह्यात फेस्टिवल फिव्हर

सुयोग आंग्रे

रायगड जिल्हा पर्यटन जिल्हा घोषित झाला नसला तरी जिल्ह्याचे निसर्गरम्य समुद्र किनारे, गड, किल्ले आणि पुरातन मंदिरे आणि प्रवासाच्या दृष्टीने जवळ असल्याने लाखो पर्यटक रायगड जिल्ह्यात परतण्याचा आनंद लुटण्यासाठी दाखल होतात. औद्योगिक जिल्हा म्हणून नावारूपाला आलेला रायगड जिल्हा आर्थिक केंद्रबिंदू बनू पाहत आहे. याचाच परिणाम रायगड जिल्ह्यात पर्यटनाला सुगीचे दिवस आले आहेत. याचा फायदा पर्यटन महोत्सव भरवणाऱ्या आयोजकांनी गेली अनेक वर्ष घेतला आहे. पर्यटन महोत्सवांबरोबरच आता अनेक ठिकाणी क्रीडा आणि कला महोत्सवाचे आयोजन करण्यावर भर दिला जात आहे.

खरेतर पर्यटन महोत्सव म्हणजे तात्पुरत्या स्वरूपातील ग्रामीण जनतेसाठी आणि येणाऱ्या पर्यटकांसाठी उपलब्ध करून दिलेला मिनी मॉल म्हणावा लागेल. याची सुरुवात अलिबाग समुद्र किनाऱ्यावर करण्यात आली आणि त्यानंतर महोत्सवाने एक वेगळीच उंची गाठली आहे. अलिबाग पर्यटनस्थळी अलिबाग नगरपरिषद, लायन्स क्लब अलिबाग, काही खासगी आयोजक, मुरुडमध्ये नगरपरिषदेचा महोत्सव, श्रीवर्धन महोत्सव असे महोत्सव वर्षागणिक वाढत गेले आता ग्रामीण भागातदेखील पर्यटन महोत्सव भरविण्यात येतात. महत्त्वाचे म्हणजे रायगड जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आता महोत्सवाचे पीक आले आहे. यंदा महोत्सवाची तारीख कोणती हे विचारण्यास नागरिकांची धडपड पाहावयास मिळते. कारण महोत्सव म्हटले किनारे आलेच.

यंदा रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात असणाऱ्या किहीम पर्यटनस्थळी लायन्स क्लब किहीम यांच्या वतीने फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले होते. या फेस्टव्हलचा डंका महाराष्ट्रात पोहचला नाही तोच आता अलिबाग येथे लायन्स क्लब अलिबागचा कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणाऱ्या फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. आता फेस्टिवल फिव्हर रायगड जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये सरकणार आहे. या महोत्सवांमध्ये नागरिकांना अपेक्षित वस्तू आणि दुकानदारांना अपेक्षित नफा मिळतो. यामुळे फेस्टिव्हल कधी लागतोय याची वाट रायगडकर आणि पर्यटक पाहत असतात.

फेस्टीवलचे आयोजन केल्याचे समजल्यानंतर पर्यटकांची संख्या अलिबागच्या दिशेने अधिक असल्याचे महोत्सवातील गर्दीच्या उच्चांकावरून पाहावयास मिळते.

रायगड जिल्ह्यात पर्यटन महोत्सवाचा ट्रेंड लायन्स क्लब अलिबागने आणला. नुसता आणला नाही या महोत्सवाच्या आयोजनामध्ये या क्लबने सातत्य ठेवले आणि महोत्सव यशस्वीदेखील करून दाखवला. महोत्सवामध्ये नियोजनबद्ध पद्धतीने स्टॉलचे नियोजन करून त्याचा मोबदला घेऊन दुकानदारांना अपेक्षित सुविधा परवान्यावर त्यांनी भर दिला. यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून चॅनल ब्रँड महोत्सवामध्ये रायगडकरांना पाहावयास मिळाले. त्यानंतर अलिबाग नगरपरिषद, मुरुड नगरपरिषद आणि खारेपाट महोत्सव या महोत्सवांनी रायगडकरांच्या मनावर राज्य केले. या महोत्सवांमध्ये मातीचे भांडे ते स्टेनलेस स्टीलची भांडी, विविध संस्कृतीचे पोशाख, चारचाकी आणि दोन चाकी वाहनांचे स्टॉल , रायगड जिल्ह्यातील पारंपरिक खाद्य संस्कृती, विदेशी खाद्य संस्कृती, सौंदर्य प्रसाधने, विकासकांच्या नवनवीन प्रकल्पांचे आराखडे, करमणुकीची साधने, कृषी ते संगणकीय क्षेत्रात अपेक्षित असणारी साधने, शैक्षणिक गरजेच्या वस्तू यांचे स्टॉल उपलब्श करून देत ग्राहकांची वाहवा मिळवली होती. या महोत्सवाचा ट्रेंड हळूहळू वाढत गेला आणि आता ग्रामीण भागामध्ये देखील महोत्सवाचे आयोजन करण्यावर भर दिला जात आहे.

या महोत्सवांमधून अनेकदा राजकीय ब्रॅण्डिंग करण्याचा ट्रेंड समोर आल्याचे रायगडकरांनी अनुभवले आहे. अशा प्रकारच्या महोत्सवामध्ये स्थानिकांना रोजगार उपलब्ध होतो आणि दुसरं म्हणजे रायगड जिल्ह्यातील संस्कृतीचे दर्शन सातासमुद्रापार जाण्यास मदत होते. आबालवृद्धांच्या सोयीप्रमाणे या महोत्सवांमध्ये स्टॉलचे नियोजन करण्यात येते. पर्यटन महोत्सवांचा ट्रेंड समोर येऊन त्याच्या यशाचा पाढा पाहता आता कला आणि क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्याची परंपरा रायगड जिल्ह्यात सुरु झाली आहे. या महोत्सवांमधून पारंपरिक नृत्य आणि रायगडची परंपरा सादरीकरण आणि आयगड जिल्ह्यातील प्रमुख खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. याचा फायदा स्थानिक खेळाडूंना होतो. यामुळे अशा महोत्सवांकडे खेळाडूदेखील डोळे लावून बसलेले असतात. यंदाच्या वर्षातील फेस्टिवलच्या आयोजनाला सुरुवात झाली आहे. मार्च अखेरपर्यंत या महोत्सवानाचे आयोजन टिपेला जाऊन पोहचेल यात तिळमात्र शंका नाही.

लोकसंसद

## मराठी सक्तीची घोषणा कागदावरच नको

महाराष्ट्रामध्ये एकीकडे मराठीला डावलून इंग्रजी शाळेचे प्रमाण वाढत असतानाच त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून मराठी भाषेला दुसरे पर्याय देऊन मराठीला हद्धपार केले जात आहे. या पार्श्वभूमीवर, राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी महाराष्ट्र राज्यातील इंग्रजीसह सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य असून 'मराठी भाषा शिकवणे सक्तीचा कायदा' करण्यात आल्याची माहिती नुकतीच दिली. तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी पुढे सांगितले. हा मराठी सक्तीचा कायदा खासगी, सीबीएसई, आयसीएसई किंवा अन्य कोणत्याही इंग्रजी शिक्षण मंडळाच्या शाळांनाही लागू असणार आहे. वास्तविक यापूर्वीही अनेक वेळा मराठी भाषेचे शिक्षण सक्तीचे केल्याचे निर्णय शासनाने वेळोवेळी काढूनसुद्धा राज्यातील सीबीएसई, आयसीएसई आणि इतर शिक्षण मंडळाच्या शाळांनी कायद्यातील पळवाटा शोधून मराठी भाषेला केराची टोपली दाखविली आहे. मराठी भाषेचे शिक्षण सक्तीचे असल्याच्या शासन निर्णयांची शासनाकडून प्रभावीपणे अंमलबजावणी न केल्यामुळे इंग्रजी शाळांमध्ये मराठी भाषा शिकविण्याची सक्ती आजतागायत केवळ कागदावरच राहिली आहे. तसेच आता या नव्या मराठी सक्तीच्या घोषणेचे होऊ नये एवढीच मराठी जनतेची माफक अपेक्षा आहे.

**– प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठीचा आग्रह धरणे गुन्हा आहे का?

मुंब्रा येथे एका बिगर मराठी फळ विक्रेत्याला मराठीत बोलण्याचा आग्रह डायघर येथील मराठी मुलाने धरल्याबद्दल तेथील परप्रांतीय फळ विक्रेत्यांनी घेरून कान पकडायला लावत माफी मागायला भाग तर पण; त्याचा व्हिडिओ बनवून तो व्हायरल केला. परप्रांतीय बिगर मराठी फळविक्रेत्यांची ही मुजोरी पाहून तळपायाची आग मस्तकात गेली. महाराष्ट्रात राहून हे परप्रांतीय इतकी मुजोरी कशी करू शकतात? महाराष्ट्रात मराठीचा आग्रह धरणे हा गुन्हा आहे का? मराठीचा आग्रह धरल्याने जर मराठी माणसालाच माफी मागायला लागत असेल तर त्यासारखे दुर्दैव मराठी आणि महाराष्ट्राचे नसेल. आपणच या परप्रांतियांना डोक्यावर घेऊन बसलो आहोत. दक्षिणेत असे परप्रांतीयांचे फाजील लाड केले जात नाही. ते लोक आपल्या भाषेशी कोणतीही तडजोड करत नाही. स्वभाषेविषयी दक्षिणेतील लोक जितके संवेदनशील असतात तितके संवेदनशील आपण आपल्या भाषेविषयी नसतो म्हणूनच आपल्याच राज्यात आपली भाषा बोलण्याचा आग्रह धरल्याने आपल्यालाच माफी मागावी लागत आहे.

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

दिनविशेष

# मुंबईचे आकर्षण : चर्चगेट रेल्वे स्टेशन

मुंबईतील मुख्य आकर्षणांपैकी एक म्हणजे चर्चगेट रेल्वे स्टेशन. आजच्याच दिवशी म्हणजेच १० जानेवारी १८७० रोजी चर्चगेट स्टेशनवरून प्रथम रेल्वे धावली होती. चर्चगेट हे मुंबईच्या जिवंत इतिहासातील एक अध्याय आहे. मुंबईमधील सर्वात वर्दळीच्या स्थानांपैकी चर्चगेट स्टेशन हे एक आहे. पश्चिम रेल्वेचे अंतिम स्टेशन म्हणून आधी कुलाबा स्टेशन ओळखले जात होते. मात्र, आता हा मान चर्चगेट स्टेशनला आहे. चर्चगेट हे गजबजलेले स्थानक केवळ दैनंदिन प्रवाशांसाठी महत्त्वाचे केंद्रच नाही तर वास्तुशिल्पीय अभिजात आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या विलक्षण मिश्रणाने अभ्यागतांना मंत्रमुग्ध करते.



हे स्टेशन गॉथिक आणि समकालीन वास्तुशिल्प रचनांचे सुसंवादी मिश्रण आहे. शहराच्या जुन्या आणि नवीन अखंडपणे एकत्र करण्याच्या क्षमतेचे प्रतीक आहे. हजारो लोकांच्या दैनंदिन दिनचर्येमध्ये गुंतागुतीने विणलेले, शहर आणि त्यापलिकडे असंख्य दैनंदिन साहसांसाठी हे स्टेशन प्रारंभ बिंदू आहे.

**चर्चगेट नाव कसे पडले?**

मुंबईतील कुलाब्यात असलेले वुड हाऊस चर्च हे अगोदर फक्त कॅथेड्रल चर्च या नावाने ओळखले जात असे. सध्या जिथे चर्चगेट स्टेशन आहे त्याच्या अगदी समोर हे चर्च होते. स्टेशनमध्ये येणारी गाडी अगदी चर्चच्या गेटसमोर येऊन थांबत असे. त्यामुळे या चर्चच्या दारात म्हणजेच गेटपर्यंत येणारे स्टेशन म्हणून त्याचे नाव चर्चगेट स्टेशन असे पडले.

चर्चगेट अभ्यासाचा आणि कौतुकाचा विषय बनतो. कारण त्याची रचना ब्रिटिश वास्तुशास्त्रीय प्रभाव आणि स्थानिक सांस्कृतिक आकृतीबंधांचे आकर्षक मिश्रण दाखवते. स्टेशनचा दर्शनी भाग, क्लिष्ट डिझाईन्स आणि ऐतिहासिक घटकांनी सुशोभित आहे. त्यामुळे तो ज्या काळात बांधला गेला होता, त्या कालखंडाबद्दल माहिती देतो. चर्चगेट स्टेशन हे मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक नेटवर्कचे प्रमुख केंद्र आहे. हे शहराच्या विविध भागांना अखंड कनेक्टिव्हिटी देते. तसेच चर्चगेट रेल्वे स्टेशनपासून गेटवे ऑफ इंडियापर्यंतचे अंतर अंदाजे २.५ किलोमीटर आहे. या लहान अंतरामुळे पर्यटक आणि रहिवाशांना मुंबईतील दोन सर्वात प्रतिष्ठित खुणा सहजतेने शोधणे सोयीचे होते. चर्चगेट रेल्वे स्थानकाच्या आजूबाजूच्या परिसरात विविध प्राधान्ये आणि बजेटची पूर्तता करणारी अनेक हॉटेल्स आहेत. जसे कि ट्रायडंट हॉटेल, हॉटेल मरीन प्लाझा, ओबेरॉय मुंबई, इंटर कॉन्टिनेंटल मरीन ड्राइव्ह, ताज हॉटेल इ. तसेच चर्चगेट रेल्वे स्थानक परिसरात बॉम्बे हॉस्पिटल, जसलोक हॉस्पिटल, ब्रीच कँडी हॉस्पिटल, सैफी हॉस्पिटल, वोक्हार्ट हॉस्पिटल अशी अग्रगण्य रुग्णालये आहेत.

चर्चगेट रेल्वे स्थानकाजवळ चर्चगेट रेल्वे स्थानकाजवळ विविध रेस्टॉरंट्स आहेत जी स्थानिकांना तसेच पर्यटकांना त्यांच्या जेवणाची निवड आणि आनंद घेण्यासाठी विविध प्रकारचे पाककृती देतात. महत्त्वाचे म्हणजे चर्चगेट रेल्वे पोलीस स्टेशन हे स्थानक परिसरात आणि आजूबाजूला सुरक्षा आणि सुरक्षा राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० जानेवारी
१) श्री. दामोदर लक्ष्मण वाणी
१०-०१-१९५५
२) श्री.सदानंद मोरेश्वर राउत
मु.पो.मापगाव, अलिबाग
१०-०१-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. चंद्रकांत मुरलीधर बाम, स्मरणार्थ अलिबाग**

**स्व. घिसीबाई पुनमिया, स्मरणार्थ पेण**

## वेदक महाविद्यालयात विविध कार्यक्रम

**तळा** : महाराष्ट्र शासनाने ''वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' हा उपक्रम विविध महाविद्यालयामध्ये राबवण्याचा आदेश दिला आहे. त्या अंतर्गत ०१ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ हा वाचन पंधरवडा साजरा केला जात आहे. त्या अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

त्यामध्ये, समूह वाचन, वैज्ञानिक पुस्तकांचे प्रदर्शन, ग्रंथ दिंडी, निबंध स्पर्धा, ग्रंथालय स्वच्छता मोहीम आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. इतर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. हे सर्व उपक्रम महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. शाहिना मिर्झा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. सदर उपक्रम राबवण्याचा उद्देश हा आहे की विद्यार्थ्यांमध्ये वाचन प्रेरणा निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन कराव, माहिती आणि ज्ञान अर्जित करावे. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल धवन एस. के., भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रायकर व्ही. एस., अंतर्गत गुणवत्ता समिती समन्वयक डॉ. एस व्ही. जामदार, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. एन. एस. शेख यांचे सहकार्य मिळाले.

# ग्राहकांसाठी लकी डिजिटल योजना

## • ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा

**| रायगड | खास प्रतिनिधी**

**महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन किंवा तीन पेक्षा अधिक वीजबिले भरून ग्राहकांना योजनेच्या लाभाची संधी साधता येणार आहे. कल्याण आणि भांडुप परिमंडळातील जवळपास ८० टक्के ग्राहक डिजिटल माध्यमातून ऑनलाईन वीजबिल भरतात. उर्वरित २० टक्के ग्राहकांना ऑनलाईन वीज बिल भरण्यास प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरणार आहे.**

०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा ऑनलाईन पद्धतीने केलेला नाही, अशा ग्राहकांसाठी ही योजना आहे. लकी ड्रॉव्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. रांगेत उभे राहून वेळ, श्रम व पैशांचा अपव्यय करण्याऐवजी महावितरणच्या उपलब्ध संकेतस्थळ, मोबाईल ॲप व इतर सुविधांमार्फत ऑनलाईन वीज बिल भरून ग्राहक ०.२५ टक्क्यांची सवलतही मिळवू शकतात.



महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रॉमध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस आदी ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीनपेक्षा अधिक महिने वीज बिल भरणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळास भेट देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणचे राज्याच्या विविध भागांमध्ये कोट्यवधींच्या संख्येने ग्राहक आहेत. त्यांच्यामार्फत दररोज लाखो युनीट वीजेचा वापर केला जातो. घरगुती ग्राहक आणि व्यावसायिक ग्राहक अशी वर्गवारी करण्यात आलेली आहे. मोठ्या संख्येने असलेल्या ग्राहकांच्या माध्यमातून वीजेचा वापर करण्यात येता. त्या बदल्यात महावितरण ग्राहकांना ठराविक रकमेचे बिल पाठवते. काही ग्राहक हे वेळवर वीज बिलाचा भरणा करतात. तर काही ग्राहक हे वेळे अभावी रक्कम भरण्यास असमर्थ ठरतात. त्यामुळे वीज बिलाची कोट्यवधींची थकबाकी राहते. यावर उपाय योजना करण्यासाठी महावितरणने सदरच्या योजनेची शक्कल लढवली आहे.

## अयोध्या श्रीराम मंदिराचा वर्धापन दिन



**| मुरुड जंजिरा | वार्ताहर |**

शनिवारी ११ जानेवारी २०२५( पौष शुक्ल द्वादशी ) रोजी अयोध्या येथील श्रीराम मंदिर प्रतिष्ठापानेला एक वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने मुरुड शहरामध्ये सकल हिंदू समाजातर्फे प्रथम वर्धापन दिन साजरा होणार आहे.

दीर्घ प्रतीक्षेनंतर उभारण्यात आलेल्या राम मंदिराचा आनंदोत्सव दीर्घकाळ साजरा होत राहावा तसेच, हिंदू धर्मियांचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्रीरामांचे अयोध्या येथील मंदिर हा जिव्हाळ्याचा विषय असल्याकारणाने त्यांचा वर्धापन दिन साजरा व्हावा. ही भावना मुरुडमधील सर्व समाज अध्यक्षांच्या बैठकीमध्ये एकमुखाने मान्य झाली.

मुरुडमधील ४५ समाज, पाखाडी आणि शहरातील दानशूर व्यक्ती यांनी कार्यक्रमासाठी आर्थिक मदत केली असून, सामाजिक एकोपा वाढीस लागावा हा या आयोजनाचा उद्देश आहे. आगामी काळामध्ये शिवजयंती, नारळी पौर्णिमा हे सण सुद्धा अशाच उत्साहामध्ये साजरे केले जातील असे कार्यकर्त्यांनी सांगितले.

११ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रामध्ये सर्व समाजांनी आपापल्या ठिकाणी मंदिरांमध्ये किंवा सार्वजनिक जागेमध्ये भजन, पूजा, नामस्मरण, पारायण असे विविध धार्मिक कार्यक्रम करावेत. दुपारी १२.३० वाजता आरती करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# म्हसळ्यात शांती संमेलन मेळावा

**| म्हसळा | वार्ताहर |**

म्हसळा येथील जेएमएम एज्युकेशन सोसायटीतर्फे अंजुमन हायस्कूलच्या प्रांगणात शनिवार ११ जानेवारी रोजी दुपारी २.३० वाजता शांती संमेलन व बंधुता मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

समाजातील अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी व नविन पिढी घडविण्यासाठी आपणा सर्वांनी एकत्र येवून विचार विनिमय करण्याची नितांत आवश्यकता असून या अनुषंगाने सालाबाद प्रमाणे नाझिम चोगले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला तहसीलदार सचिन खाडे, पोलीस निरीक्षक संदीप कहाळे, तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी माधव जाधव, गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, नगर पंचायत नगराध्यक्ष संजय कर्णिक, उपनगराध्यक्ष संजय दिवेकर, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, हिंदू समाज तालुका अध्यक्ष समीर बनकर प्रमुख पाहुणे म्हणून तर नंदू गोविलकर, महादेव पाटील, करण गायकवाड, महेंद्र ढवळे, रणजित जैन, चंद्रकांत पवार, रमेश कानये, अनंत नाक्ती, देवजी गाणेकर, अनिल बसवत, सुरेश जाधव, यशवंत पवार, सुरेश महाडिक, वेदिका पाखड, जयदास भायदे, स्वेता लटके, राजेश्री कांबळे, बाबू शिर्के, अशोक काते, सुरेश कुडेकर, हिरामण चव्हाण, सौजन्या पोटले, कोमल वेटकोळी, वनिता खोत, अनंत येलवे, पांडुरंग बने मान्यवरांची उपस्थिति राहणार आहे. यावेळी धार्मिक अभ्यासक कलीम मोहम्मदी, धार्मिक स्कॉलर अब्दुल मुईद म दनी, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य दिगंबर टेकले प्रमुख वक्ते म्हणून आपले विचार मांडणार आहेत.

सोहळ्याला सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जेएमएम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नाझीम चोगले, सचिव साजिद हुर्जूक यांनी कळविले आहे.

## २६ वर्षीय महिला बेपत्ता

**कोर्लई** : मुरुड तालुक्यामधील वावडुंगी ग्रामपंचायतीमधील महालोर येथील खान यांच्या बागेतील झोपड्यामधून लीला रोहिदास हंबिर वय २६ वर्ष या कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेल्या आहेत. याबाबत पांडुरंग शिद यांनी मुरुड पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली आहे. लीला या अंगाने सडपातळ, गोल चेहरा, हनुवटीवर गोंडवल्याचे चिन्ह, नाक सरळ आहे. या बाबत कोणासही काही माहिती पडल्यास मुरुड पोलीस ठाणे येथे संपर्क साधवा.

# रोह्यात मोटारसायकल रॅलीद्वारे जनजागृती




**| रोहा | वार्ताहर|**

१ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत संपूर्ण राज्यभर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने रस्ता सुरक्षा महिना अभियान राबविण्यात येते. यंदाही राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान अंतर्गत बुधवार ( दि. ८ जाने.) रोजी रोहे शहरात मोटार सायकल रॅली काढून मुख्य चौकच्या ठिकाणी सुरक्षा विषयी मार्गदर्शन करुन जनजागृती करण्यात आली.

सदर रस्ता सुरक्षा अभियान उपप्रादेशीक परिवहन अधिकारी महेश देवकाते, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी माधव सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. शहरातील एसटी स्टँड, तहसील, रोहा वनविभागापर्यंत मोटार सायकल रॅली काढण्यात आली. या अभियानात हेल्मेट घालणे, सीट बेल्ड लावणे, दारू पिऊन गाडी चालवू नये, वाहतूकीचे सर्व नियम पाळणे, चिन्ह ओळख, सुरक्षीत वाहन चालावने आदी संदर्भात मोटार वाहक निरीक्षक अनिस बागवान, दीपक ठाकरे, सहायक मोटार वाहक निरीक्षक अमर शेटे, दिनेश ढोपणे, मंगेश चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

# माजगाव केंद्रात ज्ञानदीप महोत्सव उत्साहात



**| माजगाव | वार्ताहर |**

येथील केंद्रात ज्ञानदीप महोत्सव उत्हात संपन्न झाला. प्रमुख जे. पी. परदेशी यांच्या संकल्पनेतून शैक्षणिक साहित्य निर्मिती, फलक लेखन, स्पॉट स्पीच, कॅरम, संगीत खुर्ची, दोरी उडी, तसेच विविध मनोरंजनात्मक स्पर्धा, असे उपक्रम राबवण्यात आले.

यावेळेस मान्यवरांचे स्वागत पर्यावरण पूरक पद्धतीने फुलझाडे व कागदी पिशवी देवून करण्यांत आले. शिक्षकांच्या स्पर्धा रायगड जिल्ह्यात प्रथमच होत असल्याचे मत अध्यक्ष दीपा परब यांनी व्यक्त केले. या स्पर्धेतील पारितोषिके सरपंच दिपाली पाटील, मा. उपसरपंच राजेश पाटील यांनी दिले.

या प्रसंगी वरिष्ठ विस्तार अधिकारी शिल्पा दास पवार, उपसरपंच प्रांजल जाधव, नरेश पाटील, बिर्ला कार्बन सी.एस.आर प्रमुख लक्ष्मण मोरे, सिप्ला सी.एस.आरच्या उल्का धुरी आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन माजगाव शाळेच्या उपशिक्षिका रेखा जाधव यांनी केले. नंतर कार्यक्रमाची सांगत करण्यात आली.

> **शिक्षकांना या स्पर्धांमधून गुण-कौशल्य विकसीत होऊन विकासाची नवी प्रेरणा मिळेल.-**
> **दीपाली पाटील, सरपंच**

> **विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून, शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या आहे.**
> **- राजेश पाटील, मा.उपसरपंच**

## खरोशी प्राथमिक शाळेला संगणक भेट

**खरोशी** : सारथी फाऊंडेशन आणि शारदा विद्यामंदिर यांच्याकडून पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरोशी येथील शाळेला संगणक भेट देण्यात आला. तसेच माध्यमिक विद्यालय खरोशी येथील दहावीच्या विद्यार्थ्यांना नवनीत पेपर प्रश्नसंच भेट देण्यात आली. आजच्या संगणकीय युगात प्रत्येक विद्यार्थ्याला संगणकीय ज्ञान प्राप्त झाले पाहिजे व संगणक क्षेत्रात तो पुढे गेला पाहिजे. शारदाश्रम विद्यामंदिरकडून अमृत महोत्सव वर्षानिमित प्राचार्य एस.बी. नगरकर यांनी प्राथमिक शाळेला संगणक संच भेट दिला.

# पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे वार्षिक स्नेहसंमेलन



**| आगरदांडा | वार्ताहर |**

मुरुड तालुक्यामधील सुप्रसिद्ध माऊंट कार्मेल हायस्कूल कोर्लईचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्सहात संपन्न झाले. सदरील वार्षिक स्नेहसंमेलनाचा विषय हा जनजगृती करणारा होता. मनुष्याला आज पर्यावरण समतोल राखणे खूप आवश्यक आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. यासाठी या हायस्कूल ने आपल्या वार्षिक स्नेहसंमेलनात पर्यावरणाची जनजागृती करण्यासाठी लोकप्रबोधनपर पर्यावरण वाचवण्यासाठी व जागरूकता निर्माण करण्यासाठी सर्व गाणी व त्यावरील डान्स पर्यावरण विषयक ठेवण्यात आली होती.

वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्धघाटना रेव्ह फादर नॉरबर्ट डिसोझा व या हायस्कूलचे चेरमन रेव्ह.फादर बोनाव्हेंचर नुनीस यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. माऊंट कार्मेल हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी, प्रथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुनील वेगस, माजी विद्यार्थिनी मनस्वी वाडकर, त्याचप्रमाणे सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूलमधील सर्व सिस्टर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना रेव्ह फा. नॉरबर्ट डिसोझा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पर्यावरण आधारित संदेश पर नृत्य व नाटिका यांचे विशेष कौतुक केले. शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष रेव्ह फा. बोनवेंचर यांनी वर्तमानकाळात आपण पशु, पक्षी, वृक्ष या सर्व पर्यावरणतील घटकावर आपण प्रेम केले पाहिजे. जसे आपण आपसातील संबंध जोपसत असतो त्याचप्रमाणे निसर्गावर सुधा प्रेम करून वनसंपदा वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे, असा मोलाचा संदेश आपल्या भाषणातून दिला. इयत्ता पहिली ते दहावी मधील सर्व शालेय विद्यार्थ्यांनी विविध नुर्त्य,नाटिका,गाणी,व वाद्यवादन सादर केले.



## तळाचे चरई बुद्रुक येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर सुरू

**| तळा | वार्ताहर |**

जीएम वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा यांच्या माध्यमातून चरई बुद्रुक येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन तळा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक सतीश गवई यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी पुरुषोत्तम मुळे हे होते. तर व्यासपीठावर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या. डॉ शाहीना मिर्झा, गाव कमिटीचे अध्यक्ष सूचित पतारे, माजी सरपंच दिलीप पांचाळ, उपाध्यक्ष सचिन पतारे, सचिव सतीश शेपुंडे, पोलीस उपनिरीक्षक अनंत तांदळेकर, माजी अध्यक्ष नामदेव काप, मनोहर काप, सुरेन्द्र काप, राजेश काप, लक्ष्मण शिंदे, प्रचीत मसाळ, नेहा पतारे, महिला मंडळ अध्यक्षा दर्शना घागरूम, उपाध्यक्षा सुलभा काप, सचिव योगिता पतारे, खजिनदार दिशाखा, सुप्रिया पातरे, सरपंच सायली घाग, माजी अध्यक्ष विठोबा काप, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी, ग्राम स्थ, महिला मोठ्या संखेने उपस्थित होते.

या वेळी बोलताना सतीश गवई विद्यार्थ्यांना एनएसएस म्हणजे काय आणि त्याचे आपल्या जीवनात किती फायदे होतात. युवकांसाठी डिजिटल साक्षरतेचे महत्व या विषयावरचे फायदे आणि त्याच पद्धतीचे तोटे याचे सखोल मार्गदर्शन केले. तसेच एमपीएससी, यूपीएससी या संदर्भात मार्गदर्शन केले. या परीक्षेत उतीर्ण होणाऱ्या उमेदवारास शासकीय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळते. विशेषत: मुलींनी पोलिस भरतीसाठी प्रयत्न करावा. आपला विभाग आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहे. अशा वेळी कुटुंबातील एक तरी व्यक्ति शासकीय सेवेत असणे जरुरीचे आहे. जेणे करून कुटुंबाची आर्थिक उन्नती होईल. याच वेळी सायबर गुन्हे कशा प्रकारे घडतात, मोबाइल चा वापर कुठे आणि कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले.

# श्री समर्थ विचार फाऊंडेशनतर्फे काव्य स्पर्धेचे आयोजन

**| रायगड | प्रतिनिधी |**

श्री समर्थ विचार फाऊंडेशन रायगडतर्फे राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वर्गीय सुशिला सखाराम पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्त साधून श्री समर्थ विचार फाऊंडेशनच्यावतीने राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धा (खुला गट) आयोजित केली आहे. राज्यातील सर्व साहित्यिकांसाठी सुवर्ण संधी आहे. सर्व साहित्यिकांनी या राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकार्तर्फे करण्यात आले आहे.

काव्य लेखन स्पर्धेचे विषय- माझी आई, आई माझे दैवत, आईविना घर खाली, असे आहेत. कोणत्याही एका विषयावर कविता लिहिणे, कविता वेळेतच पाठवावी, वेळेनंतर आलेली कविता संकलनात घेतली जाणार नाही, दिलेल्या विषयानुसार रचना येणे बंधनकारक आहे. योग्य शीर्षक द्यावे, आई हा शब्द कवितेत असणे अनिवार्य आहे, रचना स्वलिखित व अर्थपूर्ण असावी, लयबद्ध, विरामचिन्हे आणि व्याकरण नियमांनुसार लिहिण्याचा प्रयत्न करावा, प्रत्येकाने एकच रचना पोस्ट करावी, रचनेखाली आपले नाव, जिल्हा व मोबाईल क्रमांक मराठीत टाईप करावे, १६ ते २० ओळींची काव्यरचना असावी, विषयाला धरून व व्याकरण अचूक असणारी रचना असावी, पीडीएफ स्वरूपात कविता पाठवू नये, कविता ही मराठी भाषेत देवनागरी लिपीत टाईप करून दिलेली लिंक ओपनकरून जॉईन होऊन तेथे पाठवावी, परीक्षकांचा निर्णय अंतीम राहिल, कविता पाठवण्याचा कालावधी शुक्रवार १० जानेवारी ते २३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आहे, स्पर्धेचा निकाल २३ मार्च २०२५ रोजी ग्रुपवरच जाहिर करण्यात येईल, पारितोषिकाचे स्वरूप - रोख रक्कम, आकर्षक सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.

## महिंद गुरुजी यांचे प्रतापगड येथे प्रतिपादन | मंत्रयुद्ध अभ्यास शिबिराची यशस्वी सांगता

# छत्रपती शिवरायांचाच आदर्श प्रमाणभूत

**| पोलादपूर | वार्ताहर |**

माजलेला एक अफजल मोठ्या हिकमतीने जावळीच्या खोऱ्यात आणवून समूळ संपवला म्हणजेच काय तो पराक्रम नसून शिवछत्रपतींच्या या अद्वितीय कल्पक पुरुषार्थापासून शिकवण घेवून आपल्या नित्य व्यवहारात येणाऱ्या लहान-मोठ्या प्रत्येक संकटाला बुद्धीकौशल्याने सामोरे जावून जीवन निष्कंटक करायला शिकण्यासाठी या जावळीच्या खोऱ्यात येवून श्रीप्रतापगडीचे मंत्रयुद्ध आत्मसात करण्याची गरज शिवचरित्राचे गाढे अभ्यासक



डॉ. संदीप महिंद गुरुजी यांनी व्यक्त केली. गेल्या १२ वर्षांपासून प्रचलित असणाऱ्या दुर्गाभ्यास शिबिराच्या समारोप प्रसंगी शिवरायांनीच वसवलेल्या व घडविलेल्या शौर्यभूमी प्रतापगडाच्या भवानी मंडपात ते बोलत होते.

अफजलखान सुमारे बावीस हजाराचे अफाट लष्कर व प्रचंड साधनसामुग्री घेवून स्वराज्यावर चालून आला असता कोणत्याही सहकाऱ्याचे अवसान गळू न देता शिवाजी महाराजांनी कौशल्याने आपला प्रत्येक मावळा या संकटाचा सामना करण्यासाठी सिद्ध केला. सह्याद्रीच्या मुशीतील सामान्यातील सामान्य माणसांनी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न टिकविण्यासाठी असामान्य कार्य करुन पाशवी दहशतवाद संपविण्याचा आदर्श वस्तूपाठ आपल्यासमोर घालून दिल्याचे, त्यांनी ठणकावून सांगितले.

जीवनात अनेकानेक संकटे येतात ती आपली परीक्षा पाहण्यासाठी नसून आपल्यातील पुरुषार्थाला केवळ जागविण्यासाठीच असतात, याची जाणीव हे प्रतापगडीचे मंत्रयुद्ध प्रत्येकात निर्माण करत असते. शिवाजी महाराजांचे देदीप्यमान चरित्र केवळ ऐकून, वाचून, पाहून काहीही होत नाही तर सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या जिजाऊ विद्यापीठात त्याचा व्यावहारिक साक्षात्कार अनुभविण्याचा आग्रह त्यांनी याप्रसंगी सर्वांना धरला.

बेळगावसह महाराष्ट्राच्या ९ जिल्ह्यातून आलेल्या शेकडो मातृशक्ती व मुलांचा सहभाग या दुर्गाभ्यास शिबिरात घेतला होता.

## निवडक



### १८ वर्षांनी पुन्हा शाळा भरली

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील मोहो येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत १८ वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा शाळा भरली. त्यावेळचेच शिक्षक आिण विद्यार्थ्यांमुळे जणू काही शाळेचा वर्गच पुन्हा भरल्याचा भास सर्वांना झाला. यावेळी शिक्षकांसोबतचे प्रसंग, बाकांवरच्या मित्र-मैत्रिणींसोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. मोहो येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत २००१ ते २००६ पर्यंत पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन बुधवारी (दि.८) पार पडले. या स्नेहसंमेलनासाठी त्यावेळच्या मुख्याध्यापिका रसाळ, शिक्षक चिलवंत, ठाकरे, शिक्षिका भगत, म्हात्रे, बावा, सावंत आवर्जून उपस्थित होत्या. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देताना शाळेतल्या गंमतीजमती सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी विद्यार्थ्यांशी उपस्थित शिक्षकांनी संवाद साधत मोहो शाळेतील त्यांच्या आठवणी पुन्हा जागवल्या.



### बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन

**वावोशी :** आद्य दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि.६) खालापूर तालुका ग्रामीण पत्रकार संघटनेच्यावतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच, ज्येष्ठ पत्रकार हनुमंतराव ओव्हाळ, साहित्यिक बंधू अभंगे यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारितेतील योगदान आणि समाज जागृतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण करण्यात आले. या कार्यक्रमाला खालापूर तालुका ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र जाधव, सचिव जतिन मोरे, मुख्याध्यापक एस.आर. पाटील, फिरोज पिंजारी, दीपक जगताप, मानसी कांबळे, शंकर पवार, सुरेश दिघे, आशिष लोखंडे, एस.आर. कोकणे, तसेच तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

### स्मिता पाटील यांना साहित्य भूषण



**अलिबाग :** शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील राज्यस्तरीय अष्टपैलू साहित्य भूषण पुरस्कार उपक्रमशील संस्था मुंबईतर्फे दिला जातो. यंदा हा पुरस्कार स्मिता पाटील यांना मिळाला आहे. स्मिता पाटील या भारतीय साहित्यिक व सांस्कृतिक मंच तथा फ्रीडम स्टोरी ऑफ इंडियामध्ये चार वर्षे जिल्हाध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत. त्यासोबत राजिप प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. साहित्यिक कार्यासोबत त्यांचे सामाजिक, शैक्षणिक कार्यही उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्यातील योगदान बघून त्यांना आतापर्यंत राज्यस्तरीय गुणवंत शिक्षिका, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका, ग्लोबल महाराष्ट्र आयकॉन, राष्ट्रपिता महात्मा फुले समाजभूषण, अष्टपैलू काव्य भूषण, जागतिक संसद आंतरराष्ट्रीय, कोविड योद्धा असे पुरस्कार मिळाले आहेत.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- जमिनीची खरेदी व विक्री अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत रु.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३६० मीटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत. १.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्यासाठी योग्य- ९८२२२५७९२९
- Resort + Bunglow. Available fully developed Resort +Bunglow Plot Area 15.1 R Land (with exclusix Access 3.0R) on chondhi kihim Road, just 500 meters from beach, Rate Rs. 30 Lac Per Guntha. Total Lumsum price Rs 4.5 crore. All cheque payment 9822257929.
- Vacancy for Office staff in Alibag Interested Graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे वाडीमध्ये कामासाठी माणूस पाहिजे. राहण्याची सोय होईल. पगार १०,०००/- मो. नं.९८२००२९४५८.
- विहिर -आपल्या शेती-वाडीत पाण्याच्या सोईसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाची विहीर करुन घेण्यासाठी संपर्क- रणजित पाटील, सम्राट प्लेटस्, अलिबाग. फोन : ९८८१६३७०४७, ९८३४३०३९४१
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी १२ वी पास/नापास पगार -१२०००/- रुपये महिना, १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी,संपर्क- ९८२३५८५३२१
- ST स्टॅन्ड च्या शेजारी वासुदेव कॉम्प्लेक्स या इमारतीत पहिल्या मजल्यावर ७०० sqft. road touch व्यापारी गाळा भाड्याने देण्याचा आहे. फोन no. 9271432026, 7387516945
- दुकान गाळा भाड्याने मिळेल ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## वनविभागाकडून सावधानतेचा इशारा देणारे बॅनर

# खारघर टेकडीवर बिबट्याचे दर्शन?



**| पनवेल | वार्ताहर |**

**खारघर टेकडीवर बिबट्याचा वावर असल्याच्या चर्चेमुळे नागरिकांना सावध करण्यासाठी वनविभागाकडून टेकडी परिसरात सावधानतेचा इशारा देणारे बॅनर लावण्यात आले आहेत. खारघर टेकडी परिसरातील एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात काही दिवसांपूर्वी एक वन्यप्राणी कैद झाला होता.**

काही दिवसांपूर्वी खारघर टेकडीवरील फणसवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात एक वन्यप्राणी कैद झाला होता. गवत आणि झाडा झुडपातून रस्त्यावर आलेला हा प्राणी काही अवधीतच अंधारात दिसेनासा झाला. सुरक्षा रक्षक अमोल काळे आणि बाळू पाटील यांनी आरबीआय कॉलनीजवळ मेट्रो स्टेशनपासून काही मीटर अंतरावर हा प्राणी पाहिला होता. या बाबतची माहिती वनविभागाला कळवण्यात आल्यानंतर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेला प्राणी हा बिबट्या असल्याची पुष्टी होईपर्यंत खारघर टेकड्यांवर जाणाऱ्यांसाठी चेतावणी देणारे बॅनर लावण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

नवी मुंबईतील सीबीडी-बेलापूर बाजूच्या पारसिक टेकडीपासून रोहिंजन आणि ठाणे जिल्ह्याच्या पुढील भागांपर्यंत ही टेकडी पसरली आहे. टेकडीवर दोन वाड्यांमध्ये आदिवासी समाजाचे नागरिक वास्तव्यास आहेत. त्यांनी डोंगराच्या पलीकडे जाताना बिबट्याचे पिल्लू दिसल्याचे दावे केले आहेत. दरम्यान, खारघर शहराचा विकास सुरु असताना आजूबाजूच्या खाडी किनाऱ्यांमधून नागरिकांना सोनेरी कोल्ह्याचे दर्शन होत होते. त्यामुळे अनेक सोसायटीमधील नागरिक भयभीत होऊन अनेकजणांनी मॉर्निंग वॉक करणे सोडले होते. त्या कोल्ह्याला




वनविभागाने पकडून इतरत्र सोडले होते. त्यातच आता या टेकडीवर पुन्हा एका जंगली प्राणी दिसण्याची घटना घडली आहे. टेकडीवर असलेल्या आदिवासी वाड्यांत राहणाऱ्या आदिवासी नागरिकांना बिबट्या झाडा-झुडूपांत दिसला असल्याचे सांगितले होते. तात्काळ वन विभागाने पाहणी करून त्यांना बिबट्याचे ठसे किंवा त्याची विष्टा असे काहीच सापडले नाही. मात्र, एकाने मोबाइलमध्ये काढलेल्या व्हिडिओमध्ये बिबट्याचे दर्शन दिसत आहे. त्यामुळे येथील नागरिक भयभीत झाले आहेत.

### टेकडीवर प्रवेशबंदी

टेकडीवर असलेल्या चाफेवाडी, फणसवाडी या दोन आदिवासी वाड्यानवर जाण्यासाठी सिडकोने डांबरी रस्ता तयार केलेला आहे. टेकडीवरून नवी मुंबई, मुंबई, पनवेल शहराचे विहंगम दृश्य नजरेस पडते. यामुळे परिसरातील रहिवासी जॉगिंग, मेडिटेशन, योग करण्यासाठी मोठ्या प्रमाणात टेकडीवर येत असल्याने सकाळी आणि संध्याकाळी टेकडीवर जाण्यासाठी रहिवाशांना परवानगी देण्यात आली होती. आता मात्र टेकडीवर जाण्यासाठी पूर्ण पणे बंदी घालण्यात आली आहे.

### ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

टेकडीवर असलेल्या वाड्यानमधील नागरिक कामानिमित्त रात्री अपरात्री टेकडीवरील रस्त्यावर ये-जा करत असतात. बिबट्या असल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तसेच, टेकडीवर करण्यात आलेल्या प्रवेशबंदीमुळे ग्रामस्थांकडे येणाऱ्या पाहुण्यांना देखील अडवण्यात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे.

## नेरळमध्ये रंगली वक्तृत्व स्पर्धा



**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ विद्या मंदिर शाळेत दरवर्षी आंतर विद्यालय नाडकर्णी आजी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. यावर्षी या वक्तृत्व स्पर्धेत कर्जत, खालापूर आणि अंबरनाथ या तीन तालुक्यांतील १४ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात नेरळ विद्या मंदिर, विद्या विकास मंदिर, शार्विल सीबीएसई, हाजी लियाकत सीबीएसई, हाजी लियाकत इंग्लिश मिडीयम, कर्जत इंग्लिश मिडीयम स्कुल, विद्या विकास वांगणी, शारदा मंदिर कर्जत, प्राचार्य गव्हाणकर माथेरान, प्रगती विद्यालय कळंब, खालापूर तालुक्यातील स्वामी विवेकानंद शाळा वावोशी, शेंडे पाटील विद्यालय, ओमकार विद्यालय या शाळांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी विद्या मंदिर मंडळाचे संयुक्त सचिव विवेक पोतदार, संस्थेचे विश्वस्त डॉ. मिलिंद पोतदार, कार्यकारिणी सदस्य सुशांत बदल, आयोजक मुख्याध्यापक पी.बी. विचवे, उपमुख्याध्यापक गिरासे, सांस्कृतिक विभाग प्रमुख शिल्पा लाड, आर.बी. बागुल आदी मान्यवर उपस्थित होते. या वक्तृत्व स्पर्धेसाठी 'माझे आवडते पुस्तक' तसेच वादविवादासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता शाप कि वरदान' हे विषय देण्यात आले होते. परीक्षक म्हणून नीता गायकर, अनिल कवठेकर, रमाकांत साखरे आणि प्रेम जाधव यांनी काम पहिले.

### स्पर्धेचा निकाल:

वरिष्ठ गटात देविका कर्णिक प्रथम क्रमांक, दक्षता डुकरे द्वितीय क्रमांक, नम्रता बुर्डेकर तृतीय क्रमांक, तसेच गीत भंडारे याला उत्तेजनार्थम्हणूनगौरविण्यातआले. तर, लहान गटात मनाली यमगेकर प्रथम क्रमांक, आरोही गाडे द्वितीय क्रमांक, पूजा पाटील व अनुष्का मोरे तृतीय क्रमांक, तसेच, संदेश कोल्हे याला उत्तेजनार्थ म्हणून गौरविण्यात आले.

## महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महाराष्ट्रात विविध प्रकारच्या रोगांचे निदान होत आहे. परंतु, योग्य वेळी योग्य सल्ला न मिळाल्यामुळे या रोगाचे प्रमाण वाढवून त्याचे दुष्परिणाम शरीरावर होत असतात. या अनुषंगानेच स्व. लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून शेकाप रायगड जिल्हा खजिनदार प्रीतम म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन रविवारी (दि.१२) जासई येथील रा.जि.प. मराठी शाळेत करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये आरोग्य सेवा देण्यासाठी अपोलो हॉस्पिटल, मेडीकव्हर हॉस्पिटल, न्यु ईरा हॉस्पिटल, सुश्रुषा हॉस्पिटल यांचे तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि इंडियन मेडिकल असोसिएशन पनवेल यांच्या सौजन्याने मोफत औषध रुग्णांना देण्यात येणार आहेत. या महाआरोग्य शिबिरात पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिसनर्स असो. यांच्या ४०पेक्षा जास्त तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक उपस्थित राहणार आहे. दीपक कुदळे यांच्या माध्यमातून स्त्रियांसाठी मोफत थायरॉईड चेकअपची सेवा देण्यात येणार आहे. तसेच, आर.जे. शंकरा आय हॉस्पिटलच्या माध्यमातून मोफत डोळे तपासणी करून आवश्यक असल्यास योग्य ती शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे.

## विज्ञान प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**| वावोशी | वार्ताहर |**

वावोशी येथील विवेकानंद इंग्रजी माध्यम शाळेत विज्ञानाच्या अद्भुत जादूचा अनुभव देणारे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात ज्युनिअर केजी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित १००हून अधिक प्रतिकृती सादर केल्या. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित असलेले जेएसडब्ल्यू कोटेड स्टील लि. कंपनीचे मुख्याधिकारी राहुल महाकाल आणि जनरल मॅनेजर अनिल महाजन यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन यशस्वीरीत्या पार पडले. विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करताना विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करून भविष्यातील शास्त्रज्ञ तयार करणे हा उद्देश होता. पाणी, हवा, भौगोलिक बदल, ऊर्जा बचत, प्रदूषण नियंत्रण यांसारख्या विषयांवर आधारित विद्यार्थ्यांनी आकर्षक व ज्ञानवर्धक प्रतिकृती सादर करण्यात आल्या होत्या.

## एलईडी बल्ब बनविण्याची कार्यशाळा



**| उरण | वार्ताहर |**

फुंडे रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात मंगळवारी (दि.७) रयत ब्राइट एलईडी बल्ब बनविण्याची कार्यशाळा संपन्न झाली. महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेल आणि आयटी व भौतिकशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना एलईडी बल्ब तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव देणे आणि ऊर्जा कार्यक्षम प्रकाश योजनांना प्रोत्साहन देणे हा होता.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या प्रेरणादायी संदेशाने झाले. त्यांनी रयत ब्राइट एलईडी बल्बमागील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजनांचे फायदे उलगडून सांगितले. दीर्घायुष्य, उच्च कार्यक्षमता, पर्यावरण पूरकता, टिकाऊ गुणवत्ता, शून्य अल्ट्राव्हायोलेट उत्सर्जन आणि डिझाइन लवचिकता यासह ग्रीन एनर्जीच्या संकल्पनेला पाठबळ देण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील तज्ज्ञ डॉ. परेश गायकर उपस्थित होते. त्यांनी एलईडी तंत्रज्ञानाची मूलभूत माहिती देत पारंपरिक प्रकाशयोजनांच्या तुलनेत एलईडीचे कार्यक्षमतेतील आणि पर्यावरणीय फायद्यांतील उत्कृष्टत्व स्पष्ट केले. प्रत्येक सहभागीला एलईडी बल्ब तयार करण्यासाठी लागणाऱ्या सर्व घटकांचे किट देण्यात आले. डॉ. गायकवाड यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी एलईडी बल्ब तयार करण्याच्या टप्प्याटप्प्याने प्रक्रिया पूर्ण केली.

## विद्यार्थ्यांची ऑक्सिजन पार्कला भेट



**| उरण | वार्ताहर |**

रानसई येथील चादायले वाडी आदिवासी शाळेने कोमणादेवी ऑक्सिजन पार्कला भेट दिली. निसर्गातून काय शिकता येईल, हे आदिवासी बांधवांना किंवा विद्यार्थ्यांना सांगण्याची गरज नाही. परंतु, मुख्याध्यापक प्रवीण पाटील यांनी मानव निर्मित ऑक्सिजन पार्क कसा असतो, त्यात साकारणाऱ्या नवीन संकल्पना काय आहेत, भविष्यात हा पार्क कसा असेल, हे दाखवण्यासाठी मानव निर्मित ऑक्सिजन पार्क पाहण्यासाठी खास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक प्रवीण पाटील, शिक्षिका प्रतिभा लहासे, आश्वीनी कातकरी, सदाबहार दोस्ती ग्रुपचे हरिश्चंद्र म्हात्रे, सारडे विकास मंच अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

## मनोज नाक्ती यांचे निधन



**म्हसळा :** तालुका पाचगाव आगरी समाजाचे संस्थापक सदस्य, तोंडसूरे गावचे माजी सरपंच, सामाजिक, शैक्षणीक आणि राजकीय क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे मनोज कमलाकर नाक्ती यांचे बुधवारी (दि.८) निधन झाले. निधना समयी त्यांचे वय वर्षे ७५ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, मुलगी, जावई, सुना, नातवंडे आणि आप्तेष्ट परिवार आहे.



## तहसिल कार्यालयाची इमारत जमिनदोस्त

**| श्रीवर्धन | वार्ताहर |**

श्रीवर्धन येथील तहसिल कार्यालय जुन्या जागेतून नवीन जागेत (प्रशासकीय भवन येथे) स्थलांतरित झाल्याला देखील बरीच वर्षे झाली होती. तरीही भ. महावीर मार्गावरील जुनी मोडकळीस आलेली इमारत मरणासन्न अवस्थेत तग धरुन उभी होती. तिचा जिना तर केव्हाच पडून गेला होता आणि इतर भागही केव्हाही कोसळुनअपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. कृषीवलने यावर आवाज उठविला जात होता. याची दखल घेत ही जुनी इमारत नुकतीच पाडण्यात आली आहे. त्याबद्दल नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

### शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन | 'हॉर्ट सॅप' योजने अंतर्गत रोगाचे निरिक्षण

# पिकावरील रोगाचे व्यवस्थापन गरजेचे



**| तळा | वार्ताहर |**

तळा तालुक्यातील आंबा पीक हे महत्त्वाचे फळपीक आहे. मात्र, बऱ्याच वेळा आंबा बागेपासून अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याचे अनेक शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. आंबा बागेपासून अपेक्षित उत्पादन न मिळण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यातील एक प्रमुख कारण म्हणजे आंबा मोहोराचे कीड व रोगापासून नुकसान होत आहे. शेतकऱ्यांनी कीड व रोगांचे वेळीच व्यवस्थापन केल्यास आंबा पिकाचे उत्पादन निश्चितच वाढू शकेल, असे प्रतिपादन उपविभागीय कृषी अधिकारी रविशंकर कावळे यांनी केले आहे.

तळा कृषी विभागाच्यावतीने आंबा पीक कीडरोग सर्वेक्षण प्रकल्पांतर्गत बुधावारी (दि.८) शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन तळा येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात करण्यात आले होते. तसेच, शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले होत. तेव्हा ते बोलत होते.

या प्रशिक्षणाला उपविभागीय कृषी अधिकारी रविशंकर कावळे, कृषी अधिकारी आनंद कांबळे, शास्त्रज्ञ जीवन आरेकर, सचिन लोखंडे, शेतकरी, कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहाय्यकांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी, आनंद कांबळे यांनी कृषी विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या 'हॉर्ट सॅप' योजने विषयी माहिती सांगितली. त्यांनी सांगितले की, 'हॉर्ट सॅप' योजने अंतर्गत तालुक्यातून निवडक आंबा बागांची निवड करण्यात आली असून प्रत्येक आठवड्याला बागेतील कीड व रोगाचे निरीक्षणे घेण्यात येत आहे. त्यामुळे वेळीच रोग व किडीचा प्रादुर्भाव लक्षात येईल व परिणामी कीड व रोगाचे नियंत्रण करणे शक्य होईल, असे देखील त्यांनी सांगितले.

> हॉर्ट सॅप योजने अंतर्गत आंबा पिकावरील तुडतुडे, फुलकिडे, फळमाशी, भूरी व करपा या किडी व रोगाचे सर्वेक्षण करण्यात येत असून शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात येत आहे.
>
> - आनंद कांबळे, तालुका कृषी अधिकारी, तळा

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-पाषाणे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| लिना ओक मॅथ्यु<br>के. ॲन्थोनी मॅथ्यु | ४२/६ | ०-५७-०<br>पो.ख. ०-१९-० | ०.३४ |

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (०७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील जमिनी मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील जमिन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर जमिन मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे धोकवडे, ता. अलिबाग जि. रायगड येथील गट नं. ७८९, क्षेत्र ०-२३-१० हे. आर., पो. ख. ०-०२-०० हे.आर, एकुण क्षेत्र ०-२५-१० हे. आर., आकार ०.४४ रू. पैसे, ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत 'सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक नंदाबाई वासुदेव काशिद, शालिनी वासुदेव काशिद, शालिनी नथुराम मोहिते, उज्वला रविंद्र सुखदरे, दिलीप रामचंद्र राऊत, समीर दिलीप राऊत, विशाल दिलीप राऊत व सोनिया संजय पवार यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : ०९/०१/२०२५ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर हरकत

सर्व जनतेस या जाहीर हरकतीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १७, हि.नं. १, क्षेत्र ०-२४-२० हे. आर. आकार ३.३१ रु.पै. या मिळकतींपैकी ०-१६-० हे. आर या मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. मोहन रघुनाथ सुर्वे यांनी दि.७.३.२००७ रोजी विद्यमान मालक धर्मा कमल म्हात्रे, रा. पेझारी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्यासोबत सदर मिळकत विकत घेण्याकरीता साठेकरार लेखी स्वरुपात केलेला आहे. सदर मिळकतीची संपूर्ण रक्कम आमचे अशिलांनी विद्यमान मालकांस दिलेली आहे. सदरचा करारनामा अद्यापपर्यंत अस्तित्वात आहे व ताबा देखील आमच्या अशिलांना दिलेला आहे. परंतू विद्यमान मालक त्यांचे नाव ७/१२ सदरी असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विक्री करु पहात आहेत. त्यामुळे वर नमूद मिळकतींबाबत कुणीही आमच्या अशिलांच्या संमतीशिवाय खरेदी व्यवहार करु नये, असे या नोटीशीने कळविण्यात येते. याउपरही कोणी व्यक्तींने अथवा कंपनीने वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार बेकायदेशीर असून तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदर व्यवहाराविरुद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. याची नोंद घ्यावी.

तारीख : ०९.१.२०२५ **ॲड. प्रदीप प्रभाकर गावंड**
रुम नं.७/सी, हिराबाग को-ऑप. हौ. सोसायटी,
चुंबकीय वेधशाळेसमोर, अलिबाग-रायगड
मो.नं.९८८१७१६४२५

## जाहीर हरकत

सर्व जनतेस या जाहीर हरकतीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पेझारी, ता. अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ५८, हि.नं.१ क, क्षेत्र ०-३४-०० हे. आर. आकार ५.०६ रु.पै. या मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. मोहन रघुनाथ सुर्वे यांनी दि. ३.८.२००७ रोजी विद्यमान मालक निर्मलाबाई धाया पाटील, संतोष धाया पाटील (मयत) तर्फे वारस उर्मिला संतोष पाटील, मनिषा संतोष पाटील, प्रतिज्ञा संतोष पाटील, भाविक संतोष पाटील, चंद्रकांत धाया पाटील, विनायक धाया पाटील, मंदाबाई अनंत पाटील, कुंदा मारुती पाटील, सुलोचना सुरेश जुईकर, सर्व रा. पेझारी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्यासोबत सदर मिळकत विकत घेण्याकरीता करार लेखी स्वरुपात केलेला आहे. सदर मिळकतीची संपूर्ण रक्कम आमचे अशिलांनी विदयमान मालकांस दिलेली आहे. सदरचा करारनामा अद्यापपर्यंत अस्तित्वात आहे व ताबा देखील आमच्या अशिलांना दिलेला आहे. परंतू विद्यमान मालक त्यांचे नाव ७/१२ सदरी असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विक्री करु पहात आहेत. त्यामुळे वर नमूद मिळकतींबाबत कुणीही आमच्या अशिलांच्या संमतीशिवाय खरेदी व्यवहार करु नये, असे या नोटीशीने कळविण्यात येते. याउपरही कोणी व्यक्तींने अथवा कंपनीने वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार बेकायदेशीर असून तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदर व्यवहाराविरुद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. याची नोंद घ्यावी.

तारीख : ०९.१.२०२५ **ॲड. प्रदीप प्रभाकर गावंड**
रुम नं.७/सी, हिराबाग को-ऑप. हौ. सोसायटी,
चुंबकीय वेधशाळेसमोर, अलिबाग-रायगड
मो.नं.९८८१७१६४२५

## जाहीर हरकत

सर्व जनतेस या जाहीर हरकतीद्वारे कळविण्यात येते की, मौजे आंबेघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ३२, हि.नं.१ब +२ब क्षेत्र ०-४२-३० हे. आर. आकार ६.१९ रु.पै. या मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. मोहन रघुनाथ सुर्वे यांनी दि.३१.१०.२००७ रोजी विद्यमान मालक गोपीनाथ हिराजी पाटील, रा. पेझारी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्यासोबत सदर मिळकत विकत घेण्याकरीता साठेकरार लेखी स्वरुपात केलेला आहे. सदर मिळकतीची काही रक्कम आमचे अशिलांनी विद्यमान मालकांस दिलेली आहे. सदरचा करारनामा अद्यापपर्यंत अस्तित्वात आहे व ताबा देखील आमच्या अशिलांना दिलेला आहे. परंतू विद्यमान मालक त्यांचे नाव ७/१२ सदरी असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विक्री करु पहात आहेत. त्यामुळे वर नमूद मिळकतींबाबत कुणीही आमच्या अशिलांच्या संमतीशिवाय खरेदी व्यवहार करु नये, असे या नोटीशीने कळविण्यात येते. याउपरही कोणी व्यक्तींने अथवा कंपनीने वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार बेकायदेशीर असून तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदर व्यवहाराविरुद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. याची नोंद घ्यावी.

तारीख : ०९.१.२०२५ **ॲड. प्रदीप प्रभाकर गावंड**
रुम नं.७/सी, हिराबाग को-ऑप. हौ. सोसायटी,
चुंबकीय वेधशाळेसमोर, अलिबाग-रायगड
मो.नं.९८८१७१६४२५

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
## (तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म. र अर्ज ३०/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. दौपदी शिवराम पवार
मु. टेंभोर्डे, पो. बोर्ली मांडला **अर्जदार**
ता. मुरुड, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत बोरघर, **सामनेवाला**
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार श्रीम. दौपदी शिवराम पवार यांचा जन्म दि. १/१/१९९० रोजी राहत्या घरी मौजे उमटे, झगडेवाडी ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत बोरघर कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत बोरघर येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत बोरघर यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २७/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. ०९/०१/२०२५ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

ठिकाण : अलिबाग सही/-
तारिख : ०९/०१/२०२५ **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर हरकत

सर्व जनतेस या जाहीर हरकतीद्वारे कळविण्यात येते की, मौजे आंबेघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ३४, हि.नं. ४, क्षेत्र ०-५६-६० हे. आर. आकार ६.८८ रु.पै. या मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. मोहन रघुनाथ सुर्वे यांनी दि. १४.०९.२००६ रोजी विद्यमान मालक सुमन हरिश्चंद्र म्हात्रे, रा. आंबेपूर, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्यासोबत सदर मिळकत विकत घेण्याकरीता साठेकरार लेखी स्वरुपात केलेला आहे. सदर मिळकतीची संपूर्ण रक्कम आमचे अशिलांनी विद्यमान मालकांस दिलेली आहे. सदरचा करारनामा अद्यापपर्यंत अस्तित्वात आहे व ताबा देखील आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदर साठेकराराची पूर्तता करुन खरेदीखत करुन मिळणेसाठी आमचे अशिलांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायालयामध्ये दावा क्र.४७/२०२३ दाखल केला आहे. सदरचा दावा माननीय न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

परंतू विद्यमान मालक त्यांचे नाव ७/१२ सदरी असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विक्री करु पहात आहेत. त्यामुळे वर नमूद मिळकतींबाबत कुणीही आमच्या अशिलांच्या संमतीशिवाय खरेदी व्यवहार करु नये, असे या नोटीशीने कळविण्यात येते. याउपरही कोणी व्यक्तींने अथवा कंपनीने वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार बेकायदेशीर असून तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदर व्यवहाराविरुद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. याची नोंद घ्यावी.

तारीख : ०९.१.२०२५ **ॲड. प्रदीप प्रभाकर गावंड**
रुम नं.७/सी, हिराबाग को-ऑप. हौ. सोसायटी,
चुंबकीय वेधशाळेसमोर, अलिबाग-रायगड
मो.नं.९८८१७१६४२५

## Change in name

I, GAJANAN JAGANNATHRAO KARANDE Residing at Flat No-12, 2nd Floor C wing, Jwells of Alibag, chendhare, Alibag. Raigad-Maharashtra. 402201 I have changed my name from GAJANAN JAGANNATH KARANDE to GAJANAN JAGANNATHRAO KARANDE Affidavit No:- 2452041771268600352329
on date: 09/01/2025.

## निविदा जाहिरात
### ग्रुप ग्रामपंचायत वडखळ,
### ता.पेण.जि.रायगड.

मोबाईल नं. :-८८०५३८८९९९,
ईमेल ॲड्रेस:- vadkhalgrampanchayat@gmail.com

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडखळ येथे ग्रुप ग्रामपंचायत वडखळ मार्फत शैक्षणिक सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात खालील पदांवर शिक्षक नेमणे आहे.

| अ.क्र. | वर्ग | विषय | माध्यम | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ ली ते ४ थी | सर्व/संगणक | इंग्रजी/मराठी | बी.एस.सी./बी.एड.डी.एड. | ०२ |

**टीप:-**
१) परीक्षा उतीर्ण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.
२) उमेदवारांची शैक्षणिक कागदपत्र बोगस निघाल्यास या भरतीतून बाद केले जाईल.
३) पात्र उमेदवारानेच अर्ज भरणे आहे.
४) अर्ज स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.सरपंच ग्रुप ग्रामपंचायत वडखळ यांच्याकडे राखून ठेवण्यात आला आहे.
५) आलेल्या अर्जानुसार प्राप्त उमेदवारांना मुलाखतीचे ठिकाण व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.
६) सदरील उमेदवार हे वडखळ ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रातील असावेत. बाहेरील उमेदवारांनी अर्ज भरू नये.

**ग्रामसेवक,** **सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत वडखळ,** **ग्रुप ग्रामपंचायत वडखळ,**
**ता.पेण.जि.रायगड.** **ता.पेण.जि.रायगड.**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पंढरीनाथ बंडबा निळ रा. निल क्लिनिक, प्लॉट नं. २४, विजय मार्ग, सिडको ऑफिस समोर, सेक्टर नं. १, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६ यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल<br>ता.अलिबाग | ३४८ | ०-०८-४०<br>पो.ख.०-००-३०<br>एकूण ०-०८-७० | २.५६ |

**वर नमूद मिळकतीमधील ग्रामपंचायत चौल घर क्र. १८८२, क्षेत्र २८८ चौ. फूट या दगड, विटा, सिमेंटचे घर या मिळकतीसह**

सबब सदरहू जमिन व घर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरून माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०१/२०१५ सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## नाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून श्री. संदीप गोमा पाटील रा. बोर्ले पो. अजिवली, ता. पनवेल जि. रायगड यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| किरण गणपत भोमकर<br>विजय गणपत भोमकर | ६३ | ७ | ००-६३-०० | ०-५८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, **ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, मो. नं. ९१५८२७७७२८
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ दिनांक :- १०/०१/२०२५

ॲड.एस.वाय. गावंड

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
## (तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र.अर्ज ४५/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
सौ. वासंती कविश्वर पाटील
पूर्वीची वासंती शंकर पाटील अर्जदार
रा.मु. बेलपाडा, पो. हाशिवरे
ता. अलिबाग, जि. रायगड
विरूद्ध
ग्रुप ग्रामपंचायत रांजणखार-डावली, सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार सौ. वासंती कविश्वर पाटील (पूर्वीची वासंती शंकर पाटील) यांचा जन्म दि. २०/०८/१९६३ रोजी मौजे रांजणखार-डावली, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत रांजणखार-डावली कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्मनोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत रांजणखार-डावली येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत रांजणखार-डावली यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २७/०१/२०२५ पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १०/१२/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

ठिकाण : अलिबाग सही/-
तारीख : १०/१२/२०२४ **(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल सलमान हनिफ सेंदू रा. ३०४ फोर, एफ सौशल्या, ममदापर ता. कर्जत जि. रायगड. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालकाकडून विकत घेणेकरीता ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :- मौजे - ममदापुर तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|
| सुलैमान इब्राहिम शेख | १६० | ११ | १.५१.०० | १५ | १० |

वरील वर्णनाच्या बिनशेती मिळकती बाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दि. : ०९/०१/२०२५ **मनोज किसन क्षिरसागर**
(ॲडव्होकेट)
मु. सम्राट नगर, पो. नेरळ,
ता.कर्जत, जि.रायगड.
पिन कोड ४१०१०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली निवासी सदनिका मिळकत सदनिका मालक श्री. बाळाराम भिवा ठाकरे व सौ. मंगल बाळाराम ठाकरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन**

**कर्जत नगर परिषद, कर्जत यांचे हद्दीतील मौजे मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्वे नं./हिस्सा नं. २/६, प्लॉट नं. २ व सर्वे नं./हिस्सा नं. २/७ या बिनशेती मिळकतीवरील रत्नराज कॉम्प्लेक्स को. ऑप. हो. सो. मधील 'बी' विंग, दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. २०२, क्षेत्र ५१.५६ चौ. मी. म्हणजेच, ५५५ चौ. फुट बिल्टअप.**

तरी वरील निवासी सदनिका मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर निवासी सदनिका मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १०/०१/२०२५

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड - ४१० २०१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक जिमी एन मोटेवाला व मिनी जिमी मोटेवाला यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.-

**मौजे पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र. | उपविभाग क्र | क्षेत्र लागवड योग्य हे.आर.चौ.मी | क्षेत्र पोट खराबा हे.आर.चौ.मी | क्षेत्र एकुण हे.आर.चौ.मी | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| २४ | २/ब | १.७९.०० | २.८२.०० | ४.६१.०० पैकी ०.४०.०० एवढे क्षेत्र | २.१४ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत **ॲड. मोनाली रामदास हजारे**
दिनांक १०/०१/२०२५ एम. कॉम. एल. एल. बी,
पत्ता- नॅच्युरा वन, ग्राउंड फ्लोअर,
सदनिका क्र. ००४, इको ग्रीन, डिमार्ट जवळ,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं : ९२६०१०९२८२

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे नाडसूर ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - नाडसूर ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नाव | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र.हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री.रामकृष्ण शांताराम सुतार | ६९२ | १ | ०-२४-५० | ०-०६ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्रीबाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड सही /-
दिनांक :- ०९/०१/२०२५ **श्री. राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

**दुरुस्त जाहीर नोटीस**
अर्ज क्र. : - ८८/२०२५

## मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्री. संजय पांडुरंग शेलार
वय: ४३ वर्षे, धंदा : शेती.
कायमचा पत्ता :- रा. भागाड,
ता. माणगांव जि. रायगड. अर्जदार
सध्याचा पत्ता :- गणेश नगर, एस व्ही रोड,
आशिवरा ब्रिज, सिध्दिविनायक मंदिर जवळ,
गोरेगांव वेस्ट, मुंबई - ४००१०४
विरूद्ध
१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत भागाड,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. संजय पांडुरंग शेलार यांचा जन्म मौजे भागाड, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १०/०५/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. ०१/२०२५ ने दि. ०९/०१/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे भागाड, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १०/०५/१९८१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. संजय पांडुरंग शेलार यांचा जन्म मौजे भागाड, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०५/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव सही/-
ता.०९/०१/२०२५ **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विश्वास हरिश्चंद्र म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे | ५६/१ | ०-१९-४०<br>०-१३-८०<br>०-३३-२०<br>पो. ख.०-०१-००<br>०-३४-२० | ५.६८ |

पैकी ० हे. १५.१० आर, आकार २ रूपये ५० पैसे एवढी मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग सही/-
तारीख : १०/१/२०२५ **ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१

## अलिबाग चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५

# नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे शानदार उद्घाटन





### आज होणारे सामने

**अलिबाग चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा दुसरा प्रेक्षणीय सामना शुक्रवारी (दि.१०) सायंकाळी प्रशांत नाईक पुरस्कृत मॉर्निंग क्रिकेट क्लब आणि अलिबाग नगरपरिषद यांच्यामध्ये होणार आहे. त्यानंतर ग्रुप सी मधील प्रत्यक्ष उद्घाटनीय सामना त्रिश्राव्य इलेव्हन वरसोली आणि एम.डी. वॉरिअर्स थळ या संघामध्ये होणार आहे. त्यानंतर ग्रुप डी मधील सामना प्रदिप स्पोर्ट्स साखर आणि नाखवा वॉटर स्पोर्टस साखर या संघात होणार आहे. एकूण दहा सामने खेळवले जाणार आहेत.**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ अलिबाग आयोजित तीन दिवसीय नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी सायंकाळी चॅम्पियन्स क्रिकेट स्पर्धेचा जल्लोषात शुभारंभ झाला.

यावेळी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक, ॲड. निता पाटील, अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक तथा जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, सतीश प्रधान, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, गजेंद्र दळी, संजना किर, वृषाली पाटील, काका ठाकूर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, नागेश कुलकर्णी, अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती ॲड. विजय पेढवी, अशोक प्रधान, द्वारकानाथ पाटील, प्रशांत नाईक मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी, सभासद, आदींसह विविध संघाचे मालक, कर्णधार व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी प्रेक्षणीय सामना पत्रकार विरुध्द वकील यांच्यामध्ये झाला. त्यात वकील संघ विजयी ठरला असून मालिकावीराचा सन्मान ॲड. महेश म्हात्रे यांना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. ११ जानेवारीपर्यंत होणाऱ्या क्रिकेट स्पर्धेत साखरमधील प्रदिप स्पोर्ट्स, अलिबागमधील कुबेर इलेव्हन, यु.व्ही. स्पोर्ट्स, आर्यन स्ट्रायकर्स, फैझी इलेव्हन, नवगांवमधील रियांश इलेव्हन, वरसोली येथील त्रिश्राव्या इलेव्हन, आंबेपूरमधील एस.पी. सुपर प्लेअर्स, म्हात्रोळी येथील आद्य सप्लाअर्स, थळमधील एम.डी. वॉरिअर्स, नागाव येथील सिया वॉरिअर्स, साखरमधील नाखवा वॉटर स्पोर्टस्, अलिबागमधील ए.बी. ग्रुप, साखरमधील प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्ट्स, अलिबागमधील जे. डी. भार्गवी इलेव्हन, दिघोडीमधील अर्जून इलेव्हन या सोळा संघांनी सहभाग घेतला आहे.

अंतिम सामान्यानंतर स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संघाला अलिबाग चॅम्पियन्स चषक देऊन गौरविले जाणार आहे. स्पर्धेतील अंतिम विजेत्या संघाला दोन लाख रुपये व चषक, द्वीतीय क्रमांकाला एक लाख रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. मालिकावीराला दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना सायकल आणि विजेत्या व उपविजेत्या संघाला एलईडी टीव्ही देऊन सन्मानित केले जाणार आहे.

# पाकिस्तानवर यदमानपद गमावन्याची नामुष्की

## स्टेडियमची अवस्था अतिशय निराशाजनक



**| मुंबई | वृत्तसंस्था |**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीला १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तानमधील कराचीमध्ये सुरुवात होत आहे. ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलनं होणार असून टीम इंडिया सर्व सामने दुबईत खेळणार आहे. आता ही स्पर्धा ४० दिवसांवर येऊन ठेपली आहे. पण, त्याचवेळी पाकिस्तानला स्पर्धेचं यजमानपद गमावण्याची नामुष्की सहन करावी लागू शकते. पाकिस्तानमधील लाहोर, कराची आणि रावळपिंडी या तीन शहरांमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने होणार आहेत. या ठिकाणच्या स्टेडियमची अवस्था अतिशय निराशाजनक आहे, अशी माहिती समोर आली आहे. यापैकी एका स्टेडियमचे अद्याप प्लॅस्टरही पूर्ण झालेलं नाही. हे अतिशय खराब दृश्य आहे. तीन्ही स्टेडियमवर अद्याप बरीच कामं प्रलंबित आहेत. त्या मैदानात अजून बांधकाम सुरु आहे. आसन व्यवस्था, फ्लडलाईट्स, आऊटफिल्ड, खेळपट्टी या सारख्या अनेक गोष्टींमध्ये कामं बाकी आहेत, अशी माहिती सूत्रांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिली. लाहोरमधील गद्दाफी स्टेडियममध्ये अजून प्लॅस्टर देखील पूर्ण झालेलं नाही. आयसीसीच्या चेक लिस्टप्रमाणे हे काम पूर्ण होणं अपेक्षित आहे. पण, नियोजित वेळेत नॅशनल स्टेडियमचे काम पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे, असं या सूत्रांनी सांगितलं. गद्दाफी स्टेडियमध्ये साखळी फेरीत सामन्यांसह एक सेमी फायनल आणि भारत क्वालिफाय झाला नाही तर स्पर्धेची फायनल मॅच होणार आहे. पण, हे स्टेडियम सध्या आदर्श परिस्थितीपासून खूर दूर आहे. त्यामुळे आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला ओव्हरटाईम करण्याशिवाय काहीही पर्याय नाही. त्याचबरोबर घाईगडबडीत झालेल्या कामांमध्ये खेळाडूंच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड होणार नाही, याची खबरदारी आयसीसीला घ्यावी लागेल. आयसीसीच्या नियमानुसार यजमान देशाला तीन्ही स्टेडियम आयसीसीकडं सोपवण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी आहे. मात्र तसे झाले नाहीतर, पाकिस्तानचे यजमानपद जाण्याची शक्यता सुत्रांनी व्यक्त केली आहे.

# पुण्यात खेळाडूंनी केली वयाची चोरी




**| पुणे | वृत्तसंस्था |**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १६ वर्षांखालील पात्रता क्रिकेट सामन्यात खेळलेल्या खेळाडूच्या वयावर प्रतिस्पर्धी संघाने आक्षेप घेतल्यानंतर संबंधित खेळाडूने नियमांना बगल देत क्रिकेट हिरो या ॲपवरील प्रोफाइल हटवले. त्यानंतर आणखी तीन खेळाडूंनी प्रोफाइल हटवल्यामुळे पुण्यात वय चोरी करून सर्रास मैदानावर खेळणारे अनेक क्रिकेटपटू असल्याचे स्पष्ट झाले आहे. आतापर्यंत १७ खेळाडूंनी वयचोरी केल्याची माहिती आयोजक पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेकडून देण्यात आली आहे. ६ आणि ७ जानेवारीला श्री साई युवा क्रिकेट अकॅडमी विरुद्ध पीआयओसी सामना खेळवण्यात आला. त्यातील श्री साई युवा क्रिकेट अकॅडमीच्या ओंकार झिपुरडे, प्रज्वल के, डी. के. आणि रजत काळे यांनी प्रोफाइल हटवले. त्यानंतर ओंकार दुसऱ्या दिवशी गैरहजर राहिला. या संशयास्पद प्रकारानंतर पीआयओसीचे संचालक राजेश धुमाळ यांनी पीडीसीएमध्ये तक्रार केली. राजेश धुमाळ म्हणाले की, ६ जानेवारीला सामना सुरू झाला तेव्हा दाढी केलेले खेळाडू कळून येतात. शरीरयष्टीमुळेही अधिक वयाचे खेळाडू सहज ओळखता येतात. १६ वर्षांखालील खेळाडूंमध्ये परिपक्वतेचा अभाव असतो. त्यामुळे आम्ही चार मुलांवर आक्षेप घेतला होता. ओंकार हा १९ वर्षांखालील गटातही खेळला असून खुल्या गटातही खेळला आहे. त्यामुळे आम्ही आक्षेप घेतल्यानंतर त्यांनी पीडीसीएमध्ये लेखी तक्रार देण्यास सांगितले त्यानुसार आम्ही तक्रार केली आहे. साई युवा क्रिकेट क्लबचे प्रशिक्षक अर्जुन शिंदे म्हणाले की, वयचोरी करून मैदानावर खेळणाऱ्यांना माझाही विरोधच आहे. पण पालक कोणती कागदपत्रे सादर करतात हे आम्हाला ठाऊक नसते. आम्ही पालकांवर विश्वास ठेवून खेळाडूंना संधी देतो. पालक आणि खेळाडू यांनी कोणतीही खोटी कागदपत्रे न देता खरे वय सांगून संधी मिळवावी. आमच्या संघात अधिक वयाची मुले आढळली तर पीडीसीए, एमसीएची समिती जी कारवाई करेल ती आम्हाला मान्य असेल. वयचोरी करून खेळाडू खेळत असतील तर त्यांना सर्व वयोगटात खेळण्यावर बंदी घालण्यात येणार आहे. आणखी कठोर होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

# नव्या बॅटने बाबरच नशीब पालटल

**| मुंबई | प्रतिनिधी |**

पाकिस्तानी क्रिकेटपटू बाबर आजम बऱ्याच काळापासून खराब फॉर्मचा सामना करत होता. त्याच्या बॅटमधून धावा निघत नव्हत्या. एक-एक धाव घेण्यासाठी त्याचा संघर्ष सुरु होता. नव्या वर्षात त्याने त्याची बॅट बदलली. सोबतच त्याचं नशीबही बदललं. त्याला त्याचा हरवलेला फॉर्म सापडला. सोबत कमाई सुद्धा वाढली. बाबर आजमने नव्या बॅटने एकाच दिवसात दोन अर्धशतक झळकावली होती. तुम्ही विचार करत असाल, अशी ही कुठली बॅट आहे? ज्यामुळे बाबर आजमच्या करिअरमध्ये चांगले दिवस आलेत.

**■ पैसा, फॉर्म सगळच मिळतय**

याचं उत्तर आहे. सीए स्पोर्ट्स कधी काळी पाकिस्तानी दिग्गज क्रिकेटपटू इंजमाम-उल हक या बॅटने खेळायचा.



बाबर आजम आणि यूकेची बॅट बनवणारी कंपनी ग्रे निकल्स यांच्यामधील करार ३० डिसेंबरला संपला. त्यांनी बाबर आजमसोबतची स्पॉन्सरशिप कन्टिन्यू केली नाही. म्हणून बाबर आजमने पाकिस्तानी ब्रांड सीए स्पोर्ट्ससोबत करार केला. पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्सार सीए स्पोर्ट्सकडून दरवर्षी बाबर आजमला ७ कोटी रुपये मिळणार आहेत. याआधी ग्रे निकल्सकडून ५ कोटी रुपये मिळायचे. म्हणजे कमाईमध्ये २ कोटींची वाढ झाली आहे. बॅट स्पॉन्सरशिपच्या दृष्टीने पाकिस्तानी क्रिकेटच्या इतिहासातील ही मोठी डील आहे. पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्सार बाबरसोबत डील होताच अचानक या बॅटची विक्री वाढली आहे. सीए स्पोर्ट्स आणि बाबर आजममध्ये एक स्पेशल डील सुद्धा झाल्याचेही जोरदार चर्चा सुरु आहे.

## इंडिया ओपन बॅडमिंटन स्पर्धा १४ जानेवारीपासून

**मुंबई :** इंडिया ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत २० खेळाडूंचा संघ मैदानात उतरणार आहे. मागील हंगामात या स्पर्धेत १४ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. लक्ष्य सेन आणि पीव्ही सिंधू भारतीय दलाचे नेतृत्व करणार आहेत. ही स्पर्धा १४ जानेवारीपासून नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियम च्या केडी जाधव इनडोअर हॉलमध्ये खेळवली जाणार आहे. ऑलिम्पिक चॅम्पियन व्हिक्टर एक्सलसेन, ॲन से यंग आणि जगातील नंबर १ खेळाडू शी युकी सारखे सुपरस्टार देखील या स्पर्धेत खेळताना दिसणार आहेत. भारतीय बॅडमिंटन असोसिएशनचे सरचिटणीस संजय मिश्रा यांनी एक निवेदन जारी केले आहे. यामध्ये आता नवीन नावांचा समावेश होणार असल्याचे सांगितले.

## सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा | देश पातळीवर मिळवली २४ वी रँक

# ९ वर्षाचा श्लोक आणि ४२ स्पर्धांचा चषक विजेता

**| सोलापूर | प्रतिनिधी |**

जिल्ह्यातील श्लोक आळंदने वयाच्या नवव्या वर्षी ४२ स्पर्धांचा चषक विजेता बनण्याचा बहुमान मिळवला आहे. ज्या वयात मुले बालवाडीत जातात त्या वयात श्लोक स्वप्नील आळंदने लॉन टेनिस सराव सुरु केला. सध्या इयत्ता चौथीत शिकणाऱ्या अवघ्या साडे नऊ वर्षांचा श्लोक आळंदने केवळ पाच वर्षात लॉन टेनिस खेळात तब्बल ४२ राज्य तसेच राष्ट्रीय विक्रम स्थापित केले आहेत.



लष्कर भागात राहणाऱ्या श्लोकने लॉन टेनिस सरावास सुरुवात केली. श्लोकची आई मोनिका आळंद बास्केटबॉलच्या राज्य खेळाडू तर आईचे वडील मृत्यूंजय शेटरू राष्ट्रीय खेळाडू आहेत. त्याचे आजोबा सुनील आळंद हे योग प्रशिक्षक आहेत. सुरुवातीला त्याच्या आईने त्याला एका खेळात प्रावीण्य मिळवण्यासाठी त्यांनी लॉन टेनिसची निवड केली. तो साडे चार वर्षाचा झाला तेव्हा त्याने त्याचे कोच इमरान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली लॉन टेनिस खेळण्यास सुरवात केली. वयाच्या सहाव्या वर्षी तो हैदराबाद येथे अंडर एट प्रकारात स्पर्धेत पोचला. त्याने पहिल्याच स्पर्धेत उपविजेतेपद मिळवले. तो जिल्हा लॉन टेनिस असोसिएशनच्या माध्यमातून विविध स्पर्धामध्ये खेळू लागला. त्यानंतर त्याने दहा वर्ष वयोगटात अग्रमानांकन मिळवले. विविध स्पर्धांमध्ये त्याची कामगिरी उंचावत गेली. राज्य व राष्ट्रीय पातळीवर तो सातत्याने केवळ खेळतच नाही तर त्याने विजेते व उपविजेतेपद मिळवण्याचा धडाका लावला. इतक्या कमी वयात देखील श्लोकने त्याचा स्वतःचा सराव व अभ्यासाचा समतोल साधला आहे. तो सेंट थॉमस इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेत असून वर्गात सर्वाधिक गुण घेऊन प्रथम क्रमांक कायम ठेवतो. सकाळचा सराव व शाळेच्या तयारीत मिनिटभर मिळत नसल्याने तो घरंच्यासोबत गाडीवर जातानाच नाश्ता करतो व शाळेत जातो. मात्र सराव कधीही बुडवत नाही. तसेच रात्री अभ्यासदेखील तेवढ्याच जिद्दीने करतो.

आतापर्यंत मिळालेली राष्ट्रीय पारितोषिके- अंडर १२ मध्ये भुवनेश्वरमध्ये एकेरीचा विजेता- अंडर १२ मध्ये गुवाहाटीत दुहेरीत विजेता- चॅम्पियन सिरीज इंदोरमध्ये उपविजेता- अंडर १२ मध्ये दिल्लीत एकेरीत विजेता- अंडर १४ मध्ये दिल्लीत दुहेरीचा विजेता- आंतरराज्य स्पर्धा पाँडेचरीत अंडर १० गटात विजेता. राज्यस्तरीय स्पर्धेतील कामगिरी- नागपूर राज्य स्पर्धेत विजेता- नाशिकमध्ये उपविजेता- कोल्हापूरमध्ये दोन गटात विजेता- एमएसएलटीए मुंबई स्पर्धेत विजेता- आंबराई स्पर्धा सांगलीत विजेता- एनडीएलटी नागपूर स्पर्धेत विजेतेपद- मुंबई एमएसएलटीए स्पर्धेत उपविजेता- केनसिंग्टन क्लब नागपूर स्पर्धेत उपविजेता- केडीएलटीए कोल्हापूर स्पर्धेत विजेता- एमएसएलटीए मुंबई स्पर्धेत उपविजेतेपद- एसडीएलटीए सातारा स्पर्धेत विजेता- देशपातळीवर श्लोकची २४ वी रँक आहे.

## निवडक

### जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे चॅम्पियन्स ट्रॉफीतून आऊट?

**मुंबई :** टीम इंडियाचा संकटमोचक आणि प्रमुख गोलंदाज जसप्रीत बुमराह याच्या दुखापतीमुळे रोहित सेनेचं टेन्शन वाढलं आहे. बुमराहला ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पाचव्या आणि अंतिम कसोटी सामन्यात सिडनीमध्ये पाठीदुखीचा त्रास जाणवला. त्याला दुखापतीमुळे मैदानाबाहेर जावं लागलं होतं. बुमराहच्या दुखापतीवर आवश्यक तपासणी करण्यात आली. त्यानंतर बुमराह सामन्यादरम्यान परतला. मात्र त्याला दुसऱ्या डावात बॉलिंग करता आली नाही. त्यानंतर आता टीम इंडियाची आणि साऱ्या क्रिकेट चाहत्यांचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे.



बुमराहला दुखापतीमुळे चॅम्पियन्स ट्रॉफीला मुकावं लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे. इतकंच नाही, तर बुमराहला दुखापतीमुळे ६ महिने दूर रहावं लागू शकतं, असंही म्हटलं जात आहे.

टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार, अशाच प्रकारच्या दुखापतीमुळे त्रस्त असलेल्या क्रिकेटपटूंचं म्हणणं आहे की जर हे पाठीतील पेटके असेल, तर बुमराहला चॅम्पियन्स ट्रॉफीआधी दुखापतीतून पूर्णपणे फिट व्हायला हवं. तसेच ग्रेड १ स्ट्रेस फ्रॅक्चर असेल तर बुमराहला दुखापतीतून पूर्णपणे फिट होण्यासाठी वेळ लागू शकतो. तसं झालं तर बुमराहला अनेक स्पर्धांना मुकावं लागू शकतं. आता बुमराहला फार गंभीर स्वरुपाची दुखापत झालेली नसावी, अशीच आशा टीम मॅनेजमेंट आणि क्रिकेट चाहत्यांना आहे.

दरम्यान, बुमराहने ऑस्ट्रेलिया दौऱ्यात त्याच्या लौकीकाला साजेशी अशी कामगिरी केली. बुमराहने कर्णधार म्हणूनही स्वतःला सिद्ध केलं. तसेच बुमराहने बॉलिंगसह निर्णायक क्षणी चिवट बॅटिंग केली. बुमराहने रोहितच्या अनुपस्थितीत पर्थमध्ये नेतृत्व केलं आणि टीम इंडियाला विजयी सलामी मिळवून दिली होती.

### केकेआरने नाकरलेला खेळाडू झाला संघाचा हिरो



**मुंबई :** विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत राजस्थानचा बॅटर अभिजीत तोमर याने तामिळनाडू विरुद्धच्या प्री क्वार्टर फायनलमध्ये धमाकेदार शतक झळकावले आहे. लिस्ट ए क्रिकेटमधील त्याच्या भात्यातून निघालेली हे चौथे शतक आहे. राजस्थानचा हा फलंदाज आयपीएलमध्ये शाहरुख खानच्या कोलकाता नाईट रायडर्स संघाकडून मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले होते. पण त्याला फक्त एका सामन्यातच संधी मिळाली. त्यानंतर तो आयपीएलमधून गायब झाला. पण देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याचा जलवा अजूनही कायम आहे. याची झलक विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील बडोद्याच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात पाहायला मिळाली.

२९ वर्षीय फलंदाज अभिजीत तोमर हा राजस्थान संघाच्या डावाची सुरुवात करतो. उजव्या हाताने फलंदाजी करणाऱ्या या पठ्ठ्यानं बाद फेरीतील महत्त्वपूर्ण लढतीत १२५ चेंडूत १११ धावांची दमदार खेळी केली. आपल्या या शतकी खेळीत त्याने १२ चौकार आणि ४ उत्तुंग षटकार मारल्याचे पाहायला मिळाले. तामिळनाडू गोलंदाजांची धुलाई करणारा हा भिडू आयपीएलमध्येही दिसला आहे. पण त्याला फारशी संधी मिळाली नाही. २०२२ च्या हंगामात शाहरुखच्या कोलकाता नाईट रायडर्स संघानं राजस्थानच्या या खेळाडूवर ४० लाख रुपयांची बोली लावली होती. तो या हंगामात संघाकडून एकमेव सामनाही खेळला. यात त्याने फक्त ४ धावा केल्या होत्या. पण एका मॅचनंतर केकेआरनं त्याला संधीच दिली नाही. देशांतर्गत क्रिकेमधील त्याचा जलवा पाहिल्यावर कोलकाता नाईट रायडर्सनं चांगल्या खेळाडूवर डाव खेळला पण त्यांना या हिऱ्याची पारख करता आली नाही, असाच काहीसा सीन आता पाहायला मिळतोय. लिस्ट ए क्रिकेटमध्ये चौथ्या शतकासह आपल्यातील क्षमता पुन्हा एकदा दाखवून दिली. लिस्ट ए क्रिकेटमध्ये त्याच्या खात्यात ४६ पेक्षा अधिक सरासरीनं १००० हून अधिक धावा आहेत. याआधीच्या ३ पैकी दोन डावात त्याने अर्धशतकी खेळी केल्याचे पाहायला मिळाले होते.

### राज्यस्तरीय ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धा

**अकलूज :** येथे महाराष्ट्राच्या इतिहासातील पहिल्यांदाच राष्ट्रीय स्तरावर ताराराणी महिला केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ज्यामुळे राज्यभरातील महिला कुस्तीपटूंना मोठ्या संधी प्राप्त झाल्या. नुकत्याच झालेल्या शालेय विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये वेदिका शेंडेने ४६ किलो वजन गटात प्रथम, सिद्धी शितोळेने ५७ किलो वजन गटात द्वितीय, तर शिवांजली तुपे हिने ५८ किलो वजन गटात प्रथम स्थान प्राप्त केले. अहमदनगर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत वेदिका शेंडे हिने १७ वर्षे वयोगटात ४६ किलो वजन गटामध्ये रौप्यपदक मिळवले. विशेषतः ग्रामीण भागात कुस्ती हा खेळ पुरुषांसाठीच असावा असा एक अलिखित नियम आहे. ग्रामीण भागातील महिलांमध्ये कुस्तीसाठी लागणारे कौशल्य अंगभूत आहे, परंतु त्यांना निवासी कुस्ती प्रशिक्षण केंद्रांची सोय नाही. अशा परिस्थितीत, शितलदेवी मोहिते-पाटील यांनी महिलांसाठी एक स्वतंत्र ताराराणी कुस्ती केंद्र सुरू केले. जे महिला मल्लांना त्यांच्या क्षेत्रात अधिक सक्रिय करण्यासाठी, तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटू निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते. ताराराणी कुस्ती केंद्र प्रगती करीत आहे आणि येथे उच्च प्रशिक्षित प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये एनआयएस प्रशिक्षक सतपालसिंह व सुहास तरंगे यांचा समावेश आहे. ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार करण्यासाठी मार्गदर्शन करत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)